दैनिक चालु वार्ता


**तापमान**

दिवस : 33° उच्च

रात्र : 18° किमान

सूर्योदय : १२ तास २० मिनिटे

उगवणे :06:28 AM

मावळणे :06:48 PM

सूर्यास्त : ११ तास ४७ मिनिटे

उगवणे : 07:08 PM

मावळणे : 06:55 AM

**LIVE**

24k सोने प्रति १० ग्रॉम

रू.१,४८,९७०/-

22k सोने प्रति १० ग्रॉम

रू. १,३६,५५०/-

चांदी प्रति किलो

रू. २,५०,०००/-

डॉलर प्रति दर

रू.९३.८४

**वाघोलीत सलग दोन दिवस मेघगर्जनासह जोरदार पाऊस**

**केसनंद रस्त्यासह बहुतांश रस्ते पाण्याखाली**


(बातमी .... पान क्रमांक ३ वर )



* पुणे * वर्ष : ५ * मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील * अंक : २४६ * शुक्रवार दि.०३ एप्रिल २०२६ * पाने : ०४ * किंमत रु.३ * RNI No.: MAHMAR/2021/82895

* Chief Editor : D.S.Lokhande Patil * Pune * Vol 5 * Issue 246 * Friday * 03 April 2026 * Pages 04 * Price Rs.3 * RNI No.: MAHMAR/2021/82895 * E-mail : dainikchaluwartha@gmail.com

* पुणे * नांदेड * छ.संभाजीनगर * बीड * परभणी * हिंगोली * जालना * लातूर * धाराशिव * मुंबई * पालघर * ठाणे * रायगड * रत्नागिरी * अहमदनगर * सोलापूर * सातारा * सांगली * अमरावती * यवतमाळ * वर्धा * वाशिम * चंद्रपूर *


# इराण युद्ध सुरू असताना काही गडबड कराल तर पस्तावाल असा धडा शिकवू...

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंहांचा पाकिस्तानला कडक इशारा !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला कडक शब्दात इशारा दिला आहे. काही आगळीक करण्याचा प्रयत्न केल्यास जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, असे राजनाथ सिंह म्हणाले.

मध्यपूर्वेत सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी शेजाऱ्यांना इशारा दिला. ऑपरेशन सिंदूर अजून सुरु असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**काय म्हणाले राजनाथ सिंह?**

'आपले शेजारी सध्या अशा स्थितीत आहेत की ते काहीतरी आगळीक करु शकतात. त्यांनी असे केल्यास भारताकडून जोरदार आणि तीव्र स्वरुपाचे उत्तर दिले जाईल. ऑपरेशन अद्याप समाप्त झालेले नाही', असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले. सिंह यांनी यावेळी भाषणात थेट कोणत्याही देशाचे नाव घेण्याचे टाळले.

**देशात इंधन तुटवडा नाही – राजनाथ सिंह**

केरळमध्ये आयोजित सैनिक सन्मान संमेलन कार्यक्रमात राजनाथ सिंह बोलत होते.



इराणच्या होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांना भारतीय नौसेना सुरक्षितपणे बाहेर काढून देशात आणत आहे. देशात इंधन तुटवडा असल्याचा दावा राजनाथ सिंह यांनी खोडून काढला. मध्यपूर्वेतील संघर्षावरुन काहीजण विनाकारण अफवा पसरवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असेही सिंह म्हणाले. देशात पेट्रोल, डिझेल किंवा गॅसचा तुटवडा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**विरोधकांवर टीका**

विरोधक इंधन, तेल या विषयावरुन राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या कठीण काळात देशाबरोबर उभं न राहता ते राजकारण करत असल्याचे सिंह म्हणाले. 'मध्यपूर्वेत संघर्ष सुरु असल्याने हा काळ थोडा आव्हानात्मक आहे. केरळममधील अनेक लोक या भागात काम करतात पण, त्यांच्या सुरक्षेची काळजी सरकार घेत आहे, त्यामुळे अधिक काळजी करु नये', असे राजनाथ सिंह म्हणाले.

**ऑपरेशन सिंदूर**

दरम्यान, राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला अप्रत्यक्षपणे इशारा दिला आहे. गेल्यावर्षी पहलगाम येथे २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवले होते. यात भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांवर हल्ले केले. यात १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याची माहिती समोर आली होती. राजनाथ सिंह यांनी यावेळी बोलतना ऑपरेशन सिंदूर अद्याप समाप्त झाले नसल्याचेही स्पष्ट केले.

## देश विदेश थोडक्यात

### युद्धाने खेळ पालटला...

**ऑपरेशन सिंदूरवेळी पाकड्यांची साथ देणारा देश आता भारताशी मैत्री वाढवतोय;**

**पाकिस्तानला झटका !**



दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** मिडिल ईस्टमध्ये युद्ध सुरु आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये सुरु झालेल्या युद्धाला ३० पेक्षा जास्त दिवस झालेत. कोणीही मागे हटायला तयार नाहीय. अमेरिका आणि इराणने आतापर्यंत अनेक दावे केलेत.

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे युद्धात विजय मिळवल्याचा दावा करतात तर मुज्तबा खामेनेई अमेरिकेचं मोठं नुकसान केल्याचा दावा करतात. दोघांकडून काहीही दावे सुरु असले तरी युद्धात खरा फायदा भारताचा होत आहे. या युद्धा दरम्यानच भारताची विरोधी मानल्या जाणाऱ्या देशाबरोबर जवळकी वाढली आहे. हा देश म्हणजे अजरबैजान. पाकिस्तानसोबत अजरबैजानची चांगली मैत्री आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान जाहीरपणे त्यांनी पाकिस्तानची साथ दिली. आता मिडिल ईस्ट संकटादरम्यान अजरबैजनाने भारताची चांगली मदत केली आहे.

इराणमध्ये अडकलेल्या २१५ भारतीयांना अजरबैजानमार्गे बाहेर काढण्यात आलं. यासाठी भारताने अजरबैजानचे आभार मानले आहेत. बुधवारी बाकू येथे अजरबैजानचे परराष्ट्र मंत्री जेहुन बैरामोव आणि अजरबैजानमधील भारताचे नवनियुक्त राजदूत अभय कुमार यांची बैठक झाली. त्यावेळी भारताच्यावतीने अजरबैजानचे आभार मानण्यात आले.

**भारताने मानले आभार**

भारताचे राजदूत अभय कुमार यांनी इराणमधून अजरबैजानमध्ये दाखल झालेल्या भारतीय नागरिकांची व्यक्तिगत भेट घेतली. त्यांची आस्थेने चौकशी केली. त्यांना दूतावासाकडून सर्व शक्य ती मदत देण्याचं आश्वासन दिलं. पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धामुळे अनेक देशांना इराणमधून आपल्या नागरिकांना बाहेर काढावं लागलं आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर कुमार यांनी सुद्धा


(पान २ वर...☞)


## आप ने खासदार राघव चड्ढा यांना उपनेतेपदावरून हटवलं

### राज्यसभेत बोलण्यावरही घातली बंदी...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांना त्यांच्याच पक्षाने मोठा धक्का दिला आहे. आम आदमी पक्षाने चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवले आहे. चड्ढा यांच्या जागी आता आपचे खासदार अशोक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आम आदमी पक्षाने राज्यसभा सचिवालयाला राघव चड्ढा यांना पक्षाचे नेते या नात्याने सभागृहात बोलण्याची संधी नाकारण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्यामुळे आता चढ्ढा यांच्या राज्यसभेतील बोलण्याच्या वेळ कमी केला जाणार आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे मागील काही काळापासून राघव चड्ढा संसदेत जनतेशी निगडीत असलेल्या विविध प्रश्नांवर आवाज उठवत आहेत. ते लोकांसाठी फायद्याचे असणारे अनेक मुद्दे अत्यंत आक्रमकपणे मांडत आहेत. अशा वेळी त्यांना पक्षाने उपनेते पदावरून हटवल्यामुळे विविध चर्चांना उधाण आलं आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,



राघव चड्ढा हे पक्षाशी सल्लामसलत न करताच काही विशिष्ट मुद्द्यांवर भाष्य करत होते. तसेच, राज्यसभेत आपण कोणते मुद्दे उपस्थित करणार आहोत, याविषयी त्यांनी पक्षाला आधी कसलीही कल्पनाही देत नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर ही शिस्तभंगाची कारवाई केल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, मागील आठवड्यात आम आदमी पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या स्टार प्रचारकांच्या यादी जाहीर केली होती. यामध्येही चड्ढा यांना स्थान देण्यात आले नव्हते. या सर्व प्रकरणाला पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाशी संबंधित महत्त्वाच्या घडामोडींवर चड्ढा यांनी बाळगलेलं मौन कारणीभूत असल्याचं सांगितलं जात आहे. कारण २०२५ च्या दिल्ली निवडणुकीतील पक्षाच्या पराभवानंतर चड्ढा यांनी स्वतःला पक्षाच्या धोरणापासून दूर रहात. पक्षाऐवजी त्यांनी समाजातील इतर विषयांना प्राधान्य दिल्याचं पाहायला मिळालं. तर फेब्रुवारी महिन्यात दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात न्यायालयाने आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना दोषमुक्त केलं. मात्र, यावरही खासदार राघव चड्ढा यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती. त्यामुळे ते पक्षाच्या धोरणापासून लांब गेल्याची चर्चा सुरू होती. अशातच आता त्यांच्यावर पक्षाने


(पान ४ वर...☞)


## डोनाल्ड ट्रम्प यांचे संबोधन अमेरिकेत

### पण भारतावर नकारात्मक परिणाम...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** अमेरिका इस्रायल इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला संबोधित केले. परंतु, याचा नकारात्मक प्रभाव जगभरातील अनेक गोष्टींवर पाहायला मिळाला. याचा थेट फटका भारतालाही बसला आहे. शेअर मार्केट, कच्च्या तेलाच्या किमती, सोने-चांदी, रुपया आणि गुंतवणूक यावरील प्रतिकूल प्रभावामुळे भारतातील संकट अधिक गहिरे होणार असल्याचे म्हटले जात आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्र



म्प यांनी संबोधनांनी जगाला गोंधळात टाकले. इराणसोबतच्या युद्धाबाबत ट्रम्प अजूनही कोणत्याही निष्कर्षावर पोहोचलेले नाहीत. अमेरिकन नागरिकांचा विश्वास जिंकण्याच्या प्रयत्नात राष्ट्राला उद्देशून केलेल्या त्यांच्या संबोधनातून त्यांची असहाय्यता दिसून आली. युद्ध सुरूहोऊन एक

**९ लाख कोटींहून अधिक फटका !**

महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. आर्थिक परिस्थिती बिघडत चालली आहे. जगभरात तेल आणि गॅसचा तुटवडा हळूहळू वाढत आहे. यामुळे महागाई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या संबोधनानंतर परिस्थिती नकारात्मक बनली आहे. जागतिक बाजारपेठांमध्ये पुन्हा घसरण सुरू झाली.

**ट्रम्प यांचे अमेरिकेत संबोधन, पण भारताला मोठा फटका**

– भारतीय शेअर बाजारात काळा दिवस: भारतीय दृष्टिकोनातून पाहिल्यास ट्रम्प यांच्या भाषणानंतर काही मिनिटांतच भारतीय बाजार कोसळला. निफ्टी ५०० हून अधिक अंकांनी आणि सेन्सेक्स १,५०० अंकांनी घसरला. ट्रम्प यांच्या वक्तव्यामुळे जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली


(पान ४ वर...☞)


## राष्ट्रवादीचे ३० आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार !

### संजय राऊतांचा दावा; राष्ट्रवादी काँग्रेसकडून पहिली प्रतिक्रिया समोर...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात लवकरच मोठा भूकंप होण्याचे संकेत उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदे शिवसेनेतील अनेक आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत, असा मोठा दावा संजय राऊत यांनी केला आहे. या दाव्यानंतर राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रतिक्रिया समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मंत्री हसन मुश्रीफ यांनी राऊतांच्या दाव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षातील ३० आमदार पुढच्या काही महिन्यात भाजपमध्ये विलिन होतील, असा दावा संजय राऊतांनी केला आहे. यावर हसन मुश्रीफांनी एकाच वाक्यात प्रतिक्रिया देत तशी शक्यता नसल्याचे वक्तव्य केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एकही आमदार अजित दादांचा पक्ष सोडून जाणार नाही, असे हसन मुश्रीफांनी म्हटले आहे. तसेच संजय राऊतांनी केलेल्या दाव्यावर त्यांनी जोरदार टोला लगावला आहे. संजय राऊतांनी आपले खासदार सांभाळावेत तेच बरेचशे चालले आहेत अशा बातम्या आम्ही ऐकलेल्या आहेत, असे मुश्रीफ म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घटना बदलावरुन संघर्षाचे वारे वाहू लागले असल्याची चर्चा आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दिल्ली दौऱ्यावर गेल्या आहेत. त्यांच्या दिल्ली दौऱ्यात पक्षातील


(पान २ वर...☞)








# धायरीत घरादारात पाणी शिरले

## * प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांवर संकट
## * विविध संघटना व पक्षाच्या वतीने आंदोलन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पुणे - प्रतिनिधी**
**ॲड.गुणाजी मोरे**



**पुणे :** काल गुरुवारी दुपारी पडलेल्या जोरदार वादळी पावसामुळे धायरी, सिंहगड परिसरातील घरादारात पाणी शिरले त्यामुळे जीव वाचवण्यासाठी नागरिकांना घराबाहेर धाव घ्यावी लागली. पालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांवर संकट उभे आहे. आपत्ती व्यवस्थापनाची कोणत्याही प्रकारची यंत्रणा पालिकेकडे नाही त्यामुळे विरोधी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे अशी माहिती सूत्रांकडून मिळते.

धायरी बेनकरवस्ती येथे धायरी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य विशाल अर्जुन बेनकर यांच्या घरात पाणी शिरले. घरातील भांडी कुंडी प्रापंचिक वस्तूसह साहित्य पाण्यात बुडाले. किचन, स्वच्छतागृहासह हॉल मध्ये पाणी शिरले.

पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी पालिकेने पावसाळी लाईन टाकली नाही सर्व रस्त्यावर प्रचंड प्रमाणात पाणी वाहत आहे. ते पाणी सखल भागातील सोसायट्या लोकवस्त्यांसह घरादारात शिरले. पालिकेकडे तसेच सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे पुर परिस्थिती निर्माण झाली आहे तातडीने उपाययोजना कराव्यात अशी विनंती केली मात्र अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. आणिबाणीच्या प्रसंगी नागरिकांना कोणी वाली नाही त्यामुळे प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती सूत्रांकडून मिळते.

# विराज प्रकल्पाविरोधात मान ग्रामस्थांचा जनआक्रोश

## ८ एप्रिलची जनसुनावणी रद्द करण्याची मागणी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पालघर - प्रतिनिधी**
**मिलिंद चुरी**



**विराज कंपनीच्या विस्ताराला ग्रामस्थांचा कडवा विरोध, विशेष ग्रामसभेचा एकमताने ठराव; ४ एप्रिलला मोर्चांचे आयोजन**

**बोईसर :** मान ग्रामपंचायत परिसरातील विराज कंपनीच्या प्रस्तावित निर्मिती व विस्तारीकरण प्रकल्पाविरोधात स्थानिक पातळीवर तीव्र नाराजी व्यक्त होत असून, 'विराज प्रोफाइल विरुद्ध संघर्ष समिती' आणि सर्वपक्षीय प्रतिनिधींनी पत्रकार परिषद घेऊन ८ एप्रिल रोजी नियोजित जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली आहे अशी माहिती दिली. याबाबत समितीने जिल्हाधिकारी, पालघर यांना निवेदनही सादर केले आहे. या प्रकल्पाविरोधात मान ग्रामपंचायतीने २४ मार्च रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करून एकमताने ठराव मंजूर केला. या ठरावावर ४०० हून अधिक ग्रामस्थांनी स्वाक्षऱ्या करून प्रकल्पास स्पष्ट विरोध दर्शविला आहे. विशेष म्हणजे, प्रस्तावित कारखान्याच्या मालकीच्या गट क्रमांक २७ मधील जागेवरच जनसुनावणी आयोजित केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. खासगी जागेवर सुनावणी घेणे ही नागरिकांच्या भावनांना ठेस देणारी बाब असल्याचे समितीने नमूद केले.

प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर जल व वायू प्रदूषण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. तसेच जनसुनावणीसाठी शासनाने ग्रामस्थांना मत मांडण्यासाठी पुरेसा कालावधी दिला नसल्याचा आरोपही करण्यात आला. मान ग्रामपंचायत पेसा अंतर्गत येत असल्याने पेसा नियमांचे उल्लंघन होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. पत्रकार परिषदेत सरपंचांनीही या प्रकल्पाला स्पष्ट विरोध दर्शविला. जनसुनावणी कारखान्याच्या प्रांगणात न घेता शासकीय ठिकाणी घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. संविधानाच्या कलम २१ नुसार नागरिकांना मुक्तपणे जगण्याचा अधिकार असताना, प्रदूषणामुळे हा अधिकार हिरावला जात असल्याचा आरोप करण्यात आला.

नायट्रिक ॲसिडमुळे जलस्रोत व वायू प्रदूषित होत असल्याचेही नमूद करण्यात आले. कंपनीने पूर्वी केलेल्या करारातील आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप करत, सामाजिक दायित्व निधीतील दहा कोटी रुपयांपैकी एकही रुपया अद्याप मिळाला नसल्याचे सांगण्यात आले.

स्थानिकांना रोजगार देण्याचे आश्वासनही पूर्ण झाले नसून, दहा हजार कामगारांपैकी केवळ एक टक्का स्थानिकांना संधी दिल्याचा आरोप करण्यात आला. २०१२ मध्ये पर्यावरणीय हानी होणार नाही अशी दिलेली ग्वाहीही फोल ठरल्याचे समितीने नमूद केले. दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून १४ मार्च रोजी जनसुनावणी पत्र प्राप्त झाले असले तरी, उत्तर देण्यासाठी आवश्यक ४५ दिवसांचा कालावधी न दिल्याची बाबही निदर्शनास आणण्यात आली. या संपूर्ण प्रकाराच्या निषेधार्थ ४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मान ग्रामपंचायत ते विराज कारखाना गेटपर्यंत मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक भूमिपुत्र मोठ्या संख्येने यात सहभागी होणार असल्याचे समितीने सांगितले. ८ एप्रिल रोजी होणारी जनसुनावणी रद्द करण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# महासाधना सप्ताह सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी 'कर्मयोगी'प्रशिक्षण पूर्ण करावे -जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वैजापूर - प्रतिनिधी**
**अनिल सूर्यवंशी**




**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाच्या महा साधना सप्ताह या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी सहभागी व्हावे व प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

भारत सरकार क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ते ८ या दरम्यान 'साधना सप्ताह' राबविण्यात येणार आहे. राज्य शासनातील अधिकारी- कर्मचारी यांना I Got कर्मयोगी या प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात आज एका प्रशिक्षण कार्यशाळेद्वारे करण्यात आली. स्मार्ट सिटी सभागृहात हे प्रशिक्षण पार पडले. या कार्यशाळेस सर्व विभागप्रमुख, कार्यालयप्रमुखांनी तसेच क्षेत्रीय व तालुकास्तरीय अधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

माहिती व तंत्रज्ञान कक्षाचे समन्वयक शरद दिवेकर यांनी महा साधना सप्ताह, तसेच i-Got प्रणाली नोंदणी व पूर्ण करावयाचे अभ्यासक्रम याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले. राज्य शासनाने हा उपक्रम 'महासाधना' उपक्रम म्हणून राबविण्याचे ठरविले आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदलत्या काळातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न होत आहे. या उपक्रमांतर्गत विविध सादरीकरणे, मार्गदर्शन सत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, ई-गव्हर्नन्स प्रणाली, प्रभावी संवाद कौशल्य, तसेच कार्यालयीन कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांना अद्ययावत ज्ञान व कौशल्ये आत्मसात करता यावीत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यात सर्व विभागांचे व सर्व वर्गातील मिळून २६ हजार ७९७ अधिकारी- कर्मचारी कार्यरत आहेत. हे सर्व अधिकारी कर्मचारी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होतील. प्रशासनातील कामकाज अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग होणार आहे. तसेच नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठीही हा उपक्रम उपयुक्त ठरेल,असे मत जिल्हाधिकारी स्वामी यांनी व्यक्त केले. शासनाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षणाने अद्यावत करणाऱ्या या उपक्रमात सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी सहभागी होऊन नेमून दिलेल्या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# पाटस पाणीपुरवठा योजनेत अनियमिततेचा आरोप

## संभाजी ब्रिगेडकडून चौकशीची मागणी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**दौंड - प्रतिनिधी**
**अंकुश काळे**



**दौंड :** दौंड तालुक्यातील पाटस येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता व संभाव्य घोटाळा झाल्याचा आरोप करत संभाजी ब्रिगेड, पुणे यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना निवेदन सादर करण्यात आले.

संभाजी ब्रिगेड पुणे शहर अध्यक्ष अविनाश मोहिते पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर पाणीपुरवठा योजना सन २०१४-१५ मध्ये मंजूर होऊन २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात आली. या योजनेसाठी खासदार निधीतून सुमारे ४ कोटी ९९ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर राज्य शासनाकडूनही सुमारे ४० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात कोणतेही लक्षणीय अतिरिक्त काम न करता किंवा पाणी साठा व वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा न करता मोठ्या प्रमाणावर निधी खर्च दाखविण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सुमारे ५ कोटी रुपयांपर्यंत खोटी बिले तयार करून काही ठेकेदारांना निधी वितरित केल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला.

या प्रकरणामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याची शक्यता व्यक्त होत असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच दोषी अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात माहिती अधिकार कायद्यांतर्गत (RTI) माहिती मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, मिळालेल्या माहितीनुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी अविनाश अरविंद मोहिते (महानगराध्यक्ष, संभाजी ब्रिगेड पुणे), चंद्रशेखर घाडगे (जिल्हाध्यक्ष, पुणे) आणि निलेश ढगे (सचिव, पुणे) उपस्थित होते.

# सारखणी बेकायदेशीर लेआउट प्रकरणात नवे वळण

## तहसीलदार ॲक्शन मोडमध्ये, सोमवारी सुनावणी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**किनवट - प्रतिनिधी**
**शुभम शिंदे**






**किनवट :** किनवट तालुक्यातील मोजे सारखणी (जि.नांदेड) येथील सर्वे क्रमांक २२ मधील कथित बेकायदेशीर लेआउट प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून आता प्रशासनानेही या प्रकरणात हालचालींना वेग दिला आहे. याआधी तहसील कार्यालयात अकृषक (एन.ए.) नोंदच उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर निर्माण झालेल्या संशयाच्या पार्श्वभूमीवर आता तहसीलदारांनी थेट हस्तक्षेप करत चौकशीचे आदेश दिले आहेत.

तक्रारदाराने संपूर्ण प्रकरण तहसीलदारांसमोर मांडल्यानंतर त्यांनी तत्काळ दखल घेत 'संपूर्ण चौकशी केली जाईल' असे आश्वासन दिले आहे. तसेच या प्रकरणी येत्या सोमवारी तक्रारदार व संबंधित ग्रामसेवक यांना तहसील कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणात महत्त्वाची घडामोड होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. सर्वे क्रमांक २२ मधील संबंधित लेआउटचा ७/१२ उतारा अद्यापही मूळ मालकाच्या नावावरच असल्याचे दिसून येत आहे. तक्रारदाराच्या मते, याचाच गैरफायदा घेत मूळ मालकाने ग्रामसेवकाला हाताशी धरून शासनाची फसवणूक केली असून, जमिनीवर मिळणारे मोबदले, चिबडी व इतर अनुदान घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वीच या जमिनीवर बेकायदेशीर प्लॉट विक्री, विकासकामांचा अभाव, तसेच ग्रामपंचायतीच्या मंजुरीबाबतची अस्पष्टता यामुळे प्रकरण गाजत होते. त्यात आता महसूल नोंदीतील विसंगती आणि संभाव्य आर्थिक गैरव्यवहार समोर आल्याने प्रकरण अधिकच गंभीर झाले आहे. ग्रामसेवकाच्या निष्क्रियतेवर आधीच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असताना आता तहसील प्रशासनाने घेतलेली भूमिका निर्णायक ठरणार आहे. या चौकशीतून सत्य समोर येऊन दोषींवर कठोर कारवाई होईल का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# महामार्गावर न चालत्यावाहनातुन सामानाची चोरी करणारी टोळी २४ तासात पोलिसांच्या ताब्यात

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**धाराशिव - प्रतिनिधी**
**समीर मुल्ला**



**धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई**

**धाराशिव :** सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्ग वरुन जाणाऱ्या चालत्या मालवाहतुक करणाऱ्या वाहानातुन मार चोरी करणारी टोळीतील काही जण वाशी तालुक्यातील तेरखेडा पारधी पिढी येथे असल्याची माहिती धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या गस्ती वर असलेल्या पथकाने तिघांना अटक करुन मुद्देमाल जप्त केले.

धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यातील गुन्हे उघडकीस आणणे करिता धाराशिव शहरात व जिल्ह्यात पेट्रोलिंग करीत असताना पथकास गुप्त बातमी मिळाली की इसम संतोष राजेंद्र शिंदे, रा. लक्ष्मी पारधी पिढी तेरखेडा यांने त्याचे साथीदारासह रात्री इंदापुर ते वाशी जाणारे रोडवरुन चालते पिकअपमधून तेलाचे डब्बे काढले व चोरीचे डब्बे संतोष राजेंद्र शिंदे याचे घरी लक्ष्मी पारधी पिढी तेरखेडा येथे लपवून ठेवली असल्याचे माहीती वरुन पथकाने आरोपीचा शोध घेत त्याला येरमाळा येथून ताब्यात घेण्यात आला. त्यास ताब्यात घेवून त्याच्या कडे चौकशी केली असता त्याने सुरवातीस उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यास अधिक विश्वास घेवून चौकशी केली असता त्यांने सागितले की रात्री मी व पापा शंकर पवार, रा.लक्ष्मी पारधी पिढी तेरखेडा, आकाश देवीदास शिंदे, रा.पारा असे तिघांनी मिळून इंदापुर गावाचे पुढे रोडवरुन जाणारे चालत्या पिकअपमध्ये चढून ०४ तेलाचे डब्बे काढले आहेत व ते माझे घरी आहेत अशी कबुली दिली असता पथकाने ०४ तेलाचे डब्बे एकूण ८,९६० किंमती चे मोटरसायकल एकूण ६३,९६० रेडीऑन कंपनीची जिचा चेसी न MD6258K627MIA01176 माल जप्त करुन नमुद तीन आरोपी पुढील कारवाई वाशी पोलीसांच्या ताब्यात दिलेले आहे.

सदर कार्यवाही ही धाराशिव पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शनाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, पोलीस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, पोलिस नाईक बबन जाधवर, चालक पोलीस अमंलदार रोहीत दंडनाईक यांच्या पथकाने केली आहे.

(पान १ वरून...)

# राष्ट्रवादीचे ३० आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार....

कोणताही ज्येष्ठ नेता नाही. त्या भाजप नेते केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या एका पत्रात कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नावांचा केवळ उल्लेख करण्यात आला असून, त्यांच्या नावांपुढे पद नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे पटेल, तटकरे यांच्यावर सुनेत्रा पवार नाराज आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर बोलताना हसन मुश्रीफ म्हणाले, 'आमचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एकसंध आहे आणि सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा पक्ष पुढील काळात अतिशय चांगली प्रगती करेल. काही मतभेद असतील तर आम्ही एकत्र बसवून सोडवू.'

**नेमका संजय राऊतांनी कोणता मोठा दावा केला आहे?**

भविष्यामध्ये या (राष्ट्रवादी काँग्रेस) पक्षातील २५-३० आमदारांसह हा पक्ष भाजपमध्ये विलीन होणार आहे. त्याचे नेतृत्व कुणाकडे असेल हे मी आताच तुम्हाला सांगत नाही. त्याचबरोबर शिंदे गटातील तितकेच आमदार, म्हणजे २५ -२५ आमदार हे भाजपमध्ये जाणार असा मोठा दावा संजय राऊत यांनी केला आहे.

(पान १ वरून...)

# युद्धाने खेळ पालटला...

अजरबैजान सरकारचे आभार मानले आहेत.

**मध्य पूर्वेतील तणावाबद्दल चिंता**

अजरबैजानने भारतीयांना सुरक्षित मार्ग देऊन मदत केली आहे. कठिण काळात दोन्ही देशात हे व्यावहारिक सहकार्य दिसून आलय. भारतीय राजदूत आणि अजरबैजानच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या चर्चेत पश्चिम आशियाचा मुद्दा होता. अजरबैजानने मध्य पूर्वेतील तणावाबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

**ऑपरेशन सिंदूरच्यावेळी भारताने या देशाविरोधात काय पाऊल उचलेलं?**

ऑपरेशन सिंदूरच्यावेळी अजरबैजान पाकिस्तान सोबत उभा राहिलेला. भारतीय नागरिकांनी अजरबैजानच्या या निर्णयाचा विरोध केलेला. सोशल मीडियावर बॉयकॉट अजरबैजान ही मोहिम छेडण्यात आलेली. अजरबैजानवर बहिष्कार टाकण्याच्या आव्हानानंतर ट्रॅव्हल बुकिंग पोर्टल्सच्या बुकिंगमध्ये मोठी घसरण झालेली. कॅन्सलेशनच प्रमाण वाढलेलं. भारतीय पर्यटकांनी अजरबैजानला जाण्याचा निर्णय रद्द केलेला. भारतातून अजरबैजानला जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत ५६ टक्के घसरण झालेली. अजरबैजान भारतीय पर्यटकांमध्ये लोकप्रिय पर्यटन स्थळ बनत चाललं आहे. अलीकडच्या काही वर्षात अजरबैजानला जाणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे.



# रुग्ण झाले त्रस्त... कर्मचारी मात्र मस्त..!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर

**(पुणे) वाघोली :** राज्यभरातून उपचारासाठी येणाऱ्या मनोरुग्णांची येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात हेळसांड होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. रुग्णांकडूनच विविध कामे करून घेतली जात असून, वॉर्डातील अस्वच्छता, कर्मचाऱ्यांची उद्धट वर्तणूक आणि प्रशासनातील समन्वयाचा अभाव यामुळे रुग्णालयातील परिस्थिती भयावह असल्याचे दिसून आले. येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात सध्या सुमारे ९५० मनोरुग्ण उपचार घेत असून, त्यांच्यासाठी १७ वॉर्डांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र या वॉर्डांमध्ये मूलभूत सुविधा आणि स्वच्छतेचा अभाव असल्याचे पाहणीत स्पष्ट झाले.

वॉर्ड क्रमांक ३ मधील 'प्रेरणा वॉर्ड' परिसराची पाहणी केली असता, तेथील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून आले. याच वॉर्डातील रुग्णांकडून जेवण आणण्याचे काम करून घेतले जात असल्याचे निदर्शनास आले. अनेक रुग्ण अस्वच्छ अवस्थेत होते. त्यांच्या अंगावर स्वच्छ कपडे सुद्धा नव्हते. ते ज्या बेडवर झोपत होते, ते बेड, बेडशीट, फरशी तसेच बाथरूम अत्यंत अस्वच्छ होते. संपूर्ण वॉर्डातून उग्र दुर्गंधी येत होती. काही रुग्णांना झोपण्यासाठी फरशीवरच (खाली) मळकटलेली बेडशीट अंथरलेली दिसून आले. लगतच मोठ्याप्रमाणावर गवत, गर्द झाडी, दुर्गंधीयुक्त ड्रेनेज यामुळे आरोग्याबरोबरच साप, विंचू यासारख्या विषारी प्राण्यांमुळे धोका निर्माण होऊ शकतो असा प्रश्न केला असता येथील सुपरवायझर यांनी आतापर्यंत कोणालाही दंश झाला नसल्याचे सांगितले.

वॉर्डच्या बाहेर ड्रेनेज लाईन तुंबल्याने सांडपाणी साचले होते. खिडक्यांच्या काचा फुटलेल्या होत्या. रुग्णालय प्रशासनाने स्वच्छतेसाठी शासनाने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराऐवजी रोजंदारीवरील कामगारांकडून साफसफाई करून घेत असल्याचेही दिसून आले. तरीही पुरुष वॉर्डात सर्वत्र अस्वच्छता पसरलेली होती. रुग्णांशी कर्मचारी उद्धटपणे वागत असल्याचेही पाहणीत आढळून आले. रुग्णांकडून कामे करून घेतली जात असताना कर्मचारी मात्र बाजूला बसून गप्पा मारत असल्याचे चित्र होते. त्यामुळे रुग्णालयातील व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

रुग्णालयाचे अधीक्षक श्रीनिवास कोलोड यांच्या कार्यकाळात अनेक कर्मचारी नाराज असल्याची चर्चा रुग्णालयात सुरूआहे. दरम्यान, अधीक्षक कार्यालयात पाहणी केली असता श्रीनिवास कोलोड उपस्थित नव्हते. कार्यालयीन अधीक्षकही गैरहजर होते. उपअधीक्षकांना विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. एकूणच प्रशासनात ताळमेळ नसल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

निरीक्षण गृहातील वॉर्डातही प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा प्रकार समोर आला. जालना येथून एका मनोरुग्णाला दाखल करण्यासाठी त्याचे नातेवाईक रुग्णालयात आले होते. मात्र 'महावीर जयंती' असल्याचे कारण देत रुग्णाला दाखल करून घेण्यास नकार देण्यात आला. त्यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांना एक दिवस हॉटेलमध्ये मुक्काम करावा लागला.पत्रकार रुग्णालयात आल्यानंतर घाईघाईने संबंधित रुग्णाला निरीक्षण गृहात दाखल करण्यात आले. रुग्णालय प्रशासनाकडून वारंवार सुधारणा आणि सुविधा वाढवल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात मनोरुग्णांची हेळसांड होत असल्याचे या पाहणीतून स्पष्ट झाले आहे.

## येरवडा मनोरुग्णालयातील धक्कादायक प्रकार उघड



येरवडा मनोरुग्णालयात कामे करताना रुग्ण

### रुग्णांच्या वॉर्डची आतून पाहणी करण्यास पत्रकारांना मज्जाव

पत्रकारांनी संबंधित रुग्णाच्या वॉर्डमध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी केली असता, रुग्णालय प्रशासनाकडून त्यास मज्जाव करण्यात आला. अधीक्षक कामानिमित्त बाहेर गेल्याचे सांगण्यात आले. तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्याने पाहणी करता येणार नसल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. त्यामुळे रुग्णालय प्रशासन काही बाबी लपविण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.

कामात अनियमितता करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांचे याआधी निलंबन केले आहे. पुढील काळातही अशीच कारवाई करण्यात येईल. मनोरुग्णांना कामाला लावणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल. अधीक्षकपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आम्ही कामकाजात अनेक सुधारणा करण्याचा प्रयत्न करत असून यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे.

– श्रीनिवास कोलोड (अधीक्षक, मनोरूग्णालय, येरवडा)

- निरीक्षणादरम्यान धक्कादायक वास्तव उघड
- येरवडा मनोरुग्णालयात रुग्णांची हेळसांड
- रुग्णांकडूनच करून घेतली जातात कामे
- वॉर्डात अस्वच्छता, कर्मचाऱ्यांची उद्धट वागणूक

✲ सुविधा मिळत नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना सहन करावा लागतो मनस्ताप.

# आळंदीत दुहेरी हत्याकांड, गाढ झोपेत ६ वर्षीय चिमुकलीचा गळा आवळला, वृद्धेच्या डोक्यावर वार करून हत्या

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**पुणे :** वारकरी संप्रदायाची पावन नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदीत एक धक्कादायक घटना घडली आहे. केळगाव-हनुमानवाडी येथील ठाकरवाडी येथे एका ६ वर्षांच्या चिमुरडीची गळा आवळून, तर तिला सांभाळणाऱ्या ७९ वर्षीय वृद्ध महिलेची डोक्यात वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे.

बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, हनुमानवाडी येथील रहिवासी संगीता दत्तात्रय गवारी या नेहमीप्रमाणे केळगाव येथील इंद्रायणी कॅन्सर हॉस्पिटलमध्ये हाऊसकीपिंगच्या कामासाठी रात्रपाळीला गेल्या होत्या. घरी त्यांची नात धनश्री सोनू दत्तात्रय केदारी (वय ६ वर्षे) आणि तिला सांभाळण्यासाठी शेजारी राहणाऱ्या मंगल शिंदे (वय ७९ वर्षे) या दोघीच होत्या. मध्यरात्री अज्ञात इसमाने घरात शिरून गाढ झोपेत असलेल्या धनश्रीचा गळा आवळला, तर मंगल शिंदे यांच्या डोक्यावर गंभीर वार करून दोघांचीही हत्या केली. गुरुवारी सकाळी संगीता गवारी या कामावरून घरी परतल्यानंतर हा भीषण प्रकार उघडकीस आला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह पाहून त्यांनी आरडाओरडा केला. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना पाचारण केले. घटनेची माहिती मिळताच आळंदीपोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुहेरी हत्याकांडामागील नेमका उद्देश काय? चोरीच्या उद्देशाने हा हल्ला झाला की काही जुन्या वादातून, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे आळंदी आणि परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# महाराणी ताराराणीबाबत जैन मुनींच्या वक्तव्याला संभाजी ब्रिगेडचा आक्षेप

## केलेल्या विधानावर माफीची सतीश काळे यांची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी - देवा पुंडे

**पुणे :** महाराणी ताराराणी जैन महाराणी होत्या असे जैन मुनी नयन पद्मसागर यांनी केलेल्या वक्तव्याला पिंपरी चिंचवड संभाजी ब्रिगेडने आक्षेप घेतला आहे. जैन मुनींचे हे वक्तव्य भावना दुखावणारे असून त्यामध्ये तत्काळ दुरुस्ती करून महाराष्ट्राची माफी मागावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांनी केली आहे. काळे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे कि, जैन मुनी पद्मसागर यांनी नुकतेच एक विधान केले छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर औरंगजेबने अमानुष अत्याचार केल्यानंतर जैन महाराणी तारादेवींचा उदय झाला त्यांनी मुघल सत्तेला पराभूत केले असे विधान जैन मुनी पद्मसागर यांनी केले. या वक्तव्यावर संभाजी ब्रिगेडने आक्षेप घेतला. काळे म्हणाले की महाराणी ताराराणी या हंबीरराव मोहिते यांच्या कन्या आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा होत्या. त्यामुळे त्या कोणत्या कुळातील आहेत हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ताराराणी जैन असल्याबाबत इतिहासात अशा प्रकारचे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत. महाराणी ताराबाई या पराक्रमी योद्धा होत्या त्यांच्या कार्याबाबत चुकीची माहिती पसरवणे योग्य नाही. जैन धर्म हा सत्य, अहिंसा आणि शांततेचा संदेश देणारा धर्म आहे. त्यामुळे अशा प्रकारची विधाने करून समाजात गैरसमज पसरवू नयेत असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, संबंधित जैन मुनींचे वक्तव्य भावना दुखावणारे असल्याचा आरोप करत त्यांनी महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी अशी मागणीही संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे..

# पुण्यात पावसाचा धुमाकूळ; सोसाट्याचा वारा, विजेचा कडकडाट अन ढगांचा गडगडाट, नागरिकांची उडाली धांदल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**पुणे :** शहरासह उपनगरात दुपारी पुन्हा एकदा जोरदार पावसाने हजेरी लावल्याने पुणेकरांना असह्य उकाड्यापासून दिलासा मिळाला. सिंहगड रस्ता, धनकवडी, कात्रज, हडपसर, लोहगाव, खराडी भागांत गारांसह पाऊस पडला. मुसळधार पावसामुळे पुणेकरांची चांगलीच धांदल उडाली. अनेकांनी पावसात भिजण्यापेक्षा रस्त्याच्या कडेला आडोशामध्ये थांबणे पसंत केले. शहरात सोमवारपासून गारांसह मुसळधार पाऊस पडत आहे. दररोज दुपारपर्यंत वातावरण गरम असते. त्यानंतर पावसाला सुरुवात होते. अशा वातावरणामुळे पावसाळा सुरु झाल्यासारखे पुणेकरांना वाटू लागले आहे.

मंगळवारी आकाश दिवसभर ढगाळ होते. पण, पावसाने विश्रांती घेतली. बुधवारी शहरासह जिल्ह्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. उकाड्यातही वाढ झाली होती. दुपारनंतर तीनच्या सुमारास वारा सुटला आणि उपनगरांमध्ये हलक्या सरी पडल्या. तर आज दुपारपर्यंत उकाडा जाणवत होता. त्यानंतर अचानक जोरदार पावसाला सुरुवात झाली. कात्रज–सातारा रस्त्यावर गारा पडत असताना कोथरूड, कर्वेनगर– कर्वे रस्त्यावर ऊन पडले होते. तासाभरानंतर तिथे पावसाला सुरुवात झाली. तर डेक्कन–शिवाजीनगर पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. वातावरणातील बदलामुळे हवेत गारवा वाढला होता. काल रात्री साडेआठपर्यंत शहरात ०.४ मिलिमीटर तर लोहगावमध्ये ३२.६ मिलिमीटर पाऊस पडला. या हंगामात एकाच आठवड्यात दुसऱ्यांदा गारांसह पावसाची नोंद झाली.

**पावसाची शक्यता**

पुणे शहरात पुढील दोन दिवसांत कमाल आणि किमान तापमानात थोडी वाढ होणार आहे. आकाश दुपारनंतर ढगाळ राहून संध्याकाळी सोसाट्याचा वारा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे पुणे शहराला भारतीय हवामानशास्त्र विभागाने येलो अलर्ट जाहीर केला आहे.

# श्री क्षेत्र देहूत श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात

## देहू चा राजा हनुमान मित्र मंडळ वतीने विविध कार्यक्रम आयोजित

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी



**पिंपरी चिंचवड :** हनुमान जयंती म्हणजे हिंदू देवता हनुमान यांचा जन्मदिवस होय चैत्र महिन्यातील पौर्णिमा तिथीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जयंती साजरी केली जाते याच प्रमाणे दि २ रोजी श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला असून श्रीच्या अभिषेक व महापूजा पहाटे ४ ते ५ श्री चा जन्मोत्सव कीर्तन पहाटे ५ ते ७ श्री चा जन्म काळ सकाळी ६ वाजून ३९ मिनिटांनी साजरा करण्यात आला. यावेळी भावी भक्ताने फुलांचा वर्षाव करण्यात आला श्री क्षेत्र देहू ग्रामस्थ पंचक्रोशीतील सांप्रदायिक भजनी मंडळ सेवा सकाळी ९ ते ७ पर्यंत दिवसभर महिला भजनी मंडळे करण्यात आले व महाआरती रात्री ८ वाजता या आरती साठी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेण्यात आला असून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना प्रसाद बुंदी देण्यात असुन देहूगाव येथील विविध मंदिरांमध्ये श्रीरामभक्त हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. येथील हनुमान समाज मंदिर, मुख्य मंदिर, दक्षिणमुखी काळा मारुती मंदिर तसेच माळवाडी येथील हनुमान मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्युत रोषणाई आणि आकर्षक फुलांची सजावट करण्यात आले होते.दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. शिवाजी चौकातील हनुमान समाज मंदिरात पहाटे पवनसुत,अंजनीपुत्र हनुमान यांचा महाअभिषेक करण्यात आला.

यानंतर श्रींच्या जन्मोत्सवानिमित्त श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे माजी विश्वस्त भानुदास महाराज मोरे यांचे किर्तन झाले . पंचक्रोशीतील सांप्रदायिक भजनी सेवा मंडळांची भजन सेवा सुरूहोते. सायंकाळी महाआरती करण्यात आली. तसेच हनुमान चालीसा आणि सुंदरकांडाचे पठण दिवसभर सुरू होते.

मुख्य मंदिर, दक्षिणमुखी काळा मारुती मंदिर आणि माळवाडी येथील मारुती मंदिर व चिंचोली शनी मंदिरात ही विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभावाने पार पडले. देहूरोड येथील वैश्य समाज मंदिरातही हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हनुमान चालीसा, सुंदरकांड पठण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# गिरजाई प्री प्रायमरी स्कूल व कदम कोचिंग क्लासेसचा सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षीस वितरण संपन्न



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
शिलरतन लोखंडे

**नांदेड :** विजयनगर, यशवंत नगर, येथील गिरजाई प्री प्रायमरी स्कूल व कदम कोचिंग क्लासेस चे, सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम विजयनगर हनुमान मंदिर मंगल कार्यालय या ठिकाणी दि ३१ मार्च रोजी उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड हाउसिंग सोसायटी विजयनगर चे अध्यक्ष बाबुरावजी कदम कोंढेकर, हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद शिक्षिका सौ.संगीता पाटील राहेरकर ह्या होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका गीता पडवळ मॅडम, यांनी केले, तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या, व कोचिंग क्लासेस च्या शिक्षिका, प्रेरणा पाटील, सुरेखा कदम, गौरी कदम, सूर्यवंशी, सरदेशपांडे मॅडम, पुयड मॅडम, महाजन मॅडम, व तसेच संस्थेच्या सचिव सौ.अशा अनिल कदम, सहसचिव मुन्ना कदम, आनंद कदम, पंजाबराव कदम यांची उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिल कदम यांनी आभार प्रदर्शन केले.

# वाघोलीत सलग दोन दिवस मेघगर्जनासह जोरदार पाऊस

## केसनंद रस्त्यासह बहुतांश रस्ते पाण्याखाली

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर



वाघोली–केसनंद रस्त्यावरून वाहत असलेले पावसाचे पाणी

**(पुणे) वाघोली :** वाघोली व परिसरात सलग दोन दिवस झालेल्या मेघगर्जनासह जोरदार अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. बुधवारी (दि. १ एप्रिल) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली होती. त्यानंतर गुरुवारी (दि. २ एप्रिल) दुपारी चारच्या सुमारास पुन्हा एकदा जोराचा पाऊस झाल्याने वाघोलीतील बहुतांश रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

वाघोली–केसनंद रस्त्यासह पुणे–नगर महामार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्यांवर मोठ्याप्रमाणावर पाणी वाहत होते. काही ठिकाणी गुडघाभर पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागली. रस्त्यावरून वाहने सावकाश चालवावी लागत असल्याने वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली होती.

अचानक आलेल्या पावसामुळे शाळा–कॉलेजमधून घरी परतणारे विद्यार्थी, जेष्ठ नागरिक तसेच कामावरून घरी जाणारे चाकरमानी यांची मोठी गैरसोय झाली. अनेकांनी दुकाने, इमारतींचे आवार तसेच बसथांब्यांमध्ये आश्रय घेतला.

वाघोलीतील मुख्य रस्त्यांसह केसनंद रस्ता, पुणे–नगर रोड तसेच अंतर्गत रस्त्यांवरील पाणी तासन्तास न ओसरल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

**सलग दोन दिवस झालेल्या जोरदार पावसामुळे वाघोलीतील रस्त्यांवर पाणी साचले. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित प्रशासनाशी तातडीने संपर्क साधून पाणी निचरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी जलनिस्सारण व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे.**

**– रत्नमाला सातव (नगरसेविका, मनपा, पुणे)**



# पत्रकारांवरील अन्याय थांबवा
## वृत्तपत्रांना दीडपट दरवाढ द्या

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
संग्रामपूर - प्रतिनिधी
नंदकिशोर शिरसोले



**संग्रामपूर :** राज्यातील वृत्तपत्र उद्योगाला आर्थिक दिलासा देण्यासाठी जाहिरात दरात किमान दीडपट वाढ करावी तसेच पत्रकारांवरील वाढत्या अन्यायाला आळा घालावा, या प्रमुख मागण्यांसाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने बुधवारी (ता.१ एप्रिल) संग्रामपूर येथे तहसील कार्यालयासमोर लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात आले. यानंतर तहसीलदारामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून शासनाच्या योजना, निर्णय व धोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य करतो. मात्र, गेल्या काही वर्षांत कागद, प्रिंटिंग साहित्य, केमिकल्स, वीज व मनुष्यबळाच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. २०१९ पासून आतापर्यंत या खर्चात सुमारे दीडपट वाढ झाली असतानाही शासनाकडून जाहिरात दरात अपेक्षित वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे निवेदनात नमूद आहे.

राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संग्रामपूर तालुक्यातील पत्रकारांनी एकत्र येत शासनाचे लक्ष वेधले. जाहिरात दरात तात्काळ दीडपट वाढ, ई-टेंडर जाहिराती पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध करणे, शासकीय जाहिरातींसाठी किमान २०० चौ.से.आकार निश्चित करणे, जाहिरात देयके ३० दिवसांत अदा करणे, लघु व मध्यम वृत्तपत्रांना न्याय्य संधी देणे, शासन निर्णयांमध्ये पारदर्शकता राखणे, सर्व जाहिराती माहिती खात्यामार्फत देण्याची सक्ती करणे तसेच प्रलंबित तपासण्या पूर्ण करून पात्र वृत्तपत्रांना नैसर्गिक दरवाढ लागू करणे, अशा मागण्या करण्यात आल्या.

दरम्यान, राज्यात पत्रकारांवरील हल्ले व कारवाईच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबतही निवेदनात तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. अकोला, नांदेड, श्रीरामपूर, चिपळूण, पनवेल व अर्धापूर येथील घटनांचा उल्लेख करत संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. वृत्तपत्र उद्योग व पत्रकारांचे संरक्षण हे लोकशाही बळकटीसाठी अत्यावश्यक असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संग्रामपूर तालुका अध्यक्ष मिर मकसूद अली, कार्याध्यक्ष दयालसिंग चव्हाण, सचिव सतीश वानखडे, संग्रामपूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रल्हाद दातार, ज्येष्ठ पत्रकार भाऊ भोजने, काशीनाथ मानकर, प्रल्हाद सावतकर, नारायण सावतकर, सचिन पाटील, प्रभु पारस्कर, नंदू शिरसोले, युसुफ शेख, अशोक आकोटकार, कैलास खोट्टे, सुमेध दामधर, रविंद्र दांडगे, नामदेवराव येऊतकार, सुचित धनभर, सुनील मुकुंद, साबीर पठाण, संतोष आगलावे, भारत इंगळे आदी उपस्थित होते.

# इगतपुरीच्या गोवर्धने महाविद्यालयात 'विद्यार्थी गुणगौरव सोहळा' उत्साहात संपन्न

'आयाराम गयारामच्या पायी कशाला टेकवता माथा, फक्त एकदा वाचून बघा माझ्या तुकारामाची गाथा...

'भोंदू बुवा बाबांची पोपटपंची कशाला हवी, एक तरी अनुभवा माझ्या ज्ञानेश्वरांची ओवी...

– प्रमुख वक्ते –कवी व समाज प्रबोधनकार अनिल दिक्षित यांच्या कडून विद्यार्थांना वार्षिक गुणगौरव समारंभात प्रबोधनात्मक संदेश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नाशिक - प्रतिनिधी
प्रा.संजय फाकटकर

**नाशिक :** इगतपुरी येथील मविप्र संचलित, कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'विद्यार्थी गुणगौरव समारंभ' अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार सोहळ्यात पार पडला. या कार्यक्रमात शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली, त्यानंतर सामूहिक महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी आपल्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला व विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते- प्रसिद्ध कवी व प्रबोधनकार अनिल दीक्षित यांनी आपल्या ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणातून अंधश्रद्धेवर प्रहार करत ज्ञानेश्वरी आणि तुकाराम गाथेचे महत्त्व विशद केले.



गोवर्धने महाविद्यालयात वार्षिक गुणगौरव समारंभ प्रसंगी प्रमुख वक्ते व कवी अनिल दिक्षित उपस्थितांना प्रबोधनात्मक संदेश आपल्या कवितेतून देताना

'आयाराम गयारामच्या पायी कशाला टेकवता माथा, फक्त एकदा वाचून बघा माझ्या तुकारामाची गाथा...' 'भोंदू बुवा बाबांची पोपटपंची कशाला हवी, एक तरी अनुभवा माझ्या ज्ञानेश्वरांची ओवी... अशा आशयपूर्ण ओळी सादर करत त्यांनी विद्यार्थ्यांनी सन्मार्गाला लागावे, असा प्रबोधनात्मक संदेश या निमित्ताने दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व अध्यक्षस्थान मविप्र इगतपुरी तालूका संचालक ॲड. संदीप गुळवे यांनी भूषवले. त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. याप्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपतराव मुसळे, ज्ञानेश्वर लहाने (माजी सभापती घोटी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रकाश गायकर, हिरामण शेजवळ, डॉ.कल्पना वाजे, डॉ.विष्णू राठोड, डॉ.एस.एस.परदेशी, प्रा.कन्हैया चौरेसिया, प्रा.हरिश वसावे, डॉ.बी.सी.पाटील, प्रा.राकेश गायकवाड इ.मान्यवर उपस्थित होते. या वार्षिक गुणगौरव कार्यक्रमात विविध विभागातील उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना सन्मान चिन्ह व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्या शिवाय शैक्षणिक वर्षात विशेष कामगिरी करणाऱ्या आदर्श प्राध्यापक म्हणून डॉ. ज्ञानेश्वर सानप, श्रीमती शीतल थेटे, दिपक जाधव (कार्यालयीन कामकाज), सागर गायकर (शिक्षकेत्तर सेवक) म्हणून तर आदर्श विद्यार्थी म्हणून कु.आर्यन रूपवते (उत्कृष्ट तबला व ढोलकी वादक सांस्कृतिक विभाग), कु.कविता मडके (शास्त्रीय संगीत सांस्कृतिक विभाग) यांना सुद्धा विशेष मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सोहळ्याचे अतिथी परिचय व आभार प्रदर्शन डॉ.विष्णू राठोड यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.उत्तम सांगळे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.बलराम कांबळे, प्रा.अजय निकम व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक या सोहळ्यास उपस्थित होते.

# विराळच्या मातीचा सन्मान, पोहोचला प्रा.मद्देवाड यांच्यापर्यंत

## रंगकर्मी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते या नात्याने केलेल्या कार्याची दखल; बनसोडे यांच्या उपस्थितीत 'विराळ भूषण'

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते



**लातूर (उदगीर) :** श्री समर्थ जन्मभूमी प्रतिष्ठान, विराळ यांच्यावतीने ज्येष्ठ रंगकर्मी, साहित्यिक, क्रीडा प्रतिष्ठानचे प्रमुख तथा पत्रकार प्रा. बिभीषण मद्देवाड यांना 'विराळ भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले. हा सन्मान श्री समर्थ धोंडूतात्या महाराज यांच्या पावनभूमी विराळ येथील यात्रोत्सवाच्या कार्यक्रमात माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. रंगकर्म, साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानची उभारणी, पत्रकारिता व विविध सामाजिक उपक्रमांद्वारे प्रा.मद्देवाड यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्यात आला. या सोहळ्याला जिल्हा परिषद सदस्य धर्मपाल देवशेट्टे, मन्मथप्पा किडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरसिंग सोनटक्के, उपाध्यक्ष ज्ञानोबा जाधव, प्राचार्य संजय येरनाळे, कोषाध्यक्ष देवराव सोनटक्के, सचिव शिवसांब सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती होती. विराळ ग्रामस्थांच्या वतीने प्रा. मद्देवाड यांचा हा सन्मान अभिमानास्पद असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# प्रशासन गप्प, नियम धाब्यावर
## किनवटमध्ये ट्रॅव्हल्सचा बेकायदेशीर कारभार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
किनवट - प्रतिनिधी
शुभम शिंदे




**किनवट :** किनवट शहरात सध्या खाजगी ट्रॅव्हल्सचा मनमानी कारभार वाढत चालला असून प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. किनवट ते पुणे दरम्यान धावणाऱ्या या ट्रॅव्हल्सकडून कोणतेही अधिकृत दरपत्रक ठरवलेले नसल्याने भाडे पूर्णपणे मनमानी पद्धतीने आकारले जात आहे. परिस्थिती, वेळ आणि सणासुदीच्या दिवसांनुसार भाड्यात मोठी वाढ केली जाते. साधारणतः १५०० ते २००० रुपयांदरम्यान असणारे भाडे सणासुदीच्या काळात थेट ३५०० ते ४००० रुपयांपर्यंत पोहोचते. त्यामुळे प्रवाशांना आर्थिक फटका बसत असून याबाबत वारंवार तक्रारी होत आहेत.

फक्त भाड्याचाच प्रश्न नाही, तर प्रवाशांच्या सुरक्षेचाही मोठा मुद्दा समोर आला आहे. काही वाहनांची अवस्था अत्यंत धोकादायक असून गाड्यांच्या समोरील काचा फुटलेल्या अवस्थेतच प्रवास सुरूअसल्याचे दिसून येते. अशा स्थितीत प्रवास करताना चालकाच्या डोळ्यात काचेचे कण जाण्याची शक्यता असून मोठा अपघात घडू शकतो. यामुळे प्रवाशांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

याशिवाय, रस्त्याच्या कडेला वाहने उभी करून प्रवासी घेतल्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होत आहे. ट्रॅफिकचे नियम धाब्यावर बसवून हा प्रकार सुरू असताना प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी संताप व्यक्त केला जात आहे. किनवटहून पुण्याला जाण्यासाठी कोणतीही नियमित बस सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना पर्याय नसल्याने या खाजगी ट्रॅव्हल्सवर अवलंबून राहावे लागत आहे. पूर्वी प्रवासी किनवटहून नांदेडमार्गे बस किंवा रेल्वेने प्रवास करत होते. मात्र आता थेट सुविधा मिळत असल्याने, मनमानी भाडे आणि असुरक्षित प्रवास असूनही नागरिक नाईलाजाने खाजगी ट्रॅव्हल्सचा पर्याय स्वीकारत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दरनियंत्रण, सुरक्षेचे नियम आणि वाहतूक शिस्त यांची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

(पान १ वरून...)

## डोनाल्ड ट्रम्प यांचे संबोधन अमेरिकेत...

आहे. गुरुवारी सकाळच्या सत्रात ९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

– कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या: मध्य पूर्वेतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ दिसून येत आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्याने सर्व काही उलटेपालटे केले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १०६ डॉलरच्या वर पोहोचल्या आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीतील ही वाढ भारतासाठी एक धोक्याचा इशारा आहे, कारण भारताला जास्त दराने कच्चे तेल खरेदी करावे लागू शकते.

– सोने आणि चांदीच्या किमतीत घसरण: संकटाच्या काळात सोने आणि चांदीला अनेकदा सुरक्षित गुंतवणूक मानले जाते, परंतु सध्याच्या परिस्थितीत दोन्हीच्या किमतीत मोठी घसरण होत आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर एमसीएक्सवर सोन्याच्या किमतीत जवळपास २ टक्क्यांची घसरण झाली, तर चांदीच्या किमतीत तब्बल ५ टक्क्यांची घसरण झाली.

– रुपया कमजोर: ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर रुपयावर दबाव वाढत असून, ही देशासाठी चिंतेची बाब आहे. जागतिक बाजारातील अनिश्चिततेमुळे रुपया आणखी कमजोर होऊ शकतो. सध्या एक डॉलर सुमारे ९३.५० रुपये आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या सुमारे ८५% आयात करतो, ज्याचे पैसे डॉलरमध्ये दिले जातात. रुपया कमजोर झाल्यामुळे आयातीचा खर्च वाढेल, ज्यामुळे अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होईल.

– गुंतवणुकीच्या निर्णयातील अनिश्चितता: अशा वातावरणात, गुंतवणूकदार कोणत्याही देशात गुंतवणूक करणे टाळू शकतात. कंपन्या नवीन गुंतवणूक थांबवू शकतात, ज्यामुळे भांडवली खर्च मंदावू शकतो. शेकडो भारतीय कंपन्या अमेरिकेत कार्यरत आहेत. या युद्धाचा परिणाम स्पष्ट दिसू लागल्याने, नोकरकपात आधीच सुरू झाली आहे. पगारवाढ धोक्यात आहे. हे भीतीदायक वातावरण, विशेषतः शेअर बाजारातील, परदेशी गुंतवणूकदारांना भारतीय बाजारातून निधी काढून घेण्यास प्रवृत्त करत आहे. केवळ मार्च महिन्यातच, एफपीआयने भारतीय बाजारातून १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम काढून घेतली, असे सांगितले जात आहे.

# लोहा शहरातील पारेकर गल्लीतील मारोती मंदिरात भंडाऱ्याचा कार्यक्रम संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी



**नांदेड :** लोहा शहरातील पारेकर गल्लीतील मारोती मंदिरात दि. २ मार्च रोजी भंडाऱ्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. लोहा शहरातील पारेकर गल्लीतील मारोती मंदिरात दि.२ मार्च २०२६ श्री हनुमान (मारोती) जयंतीनिमित्त भंडाऱ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महारूद्र मारोती ची महाआरती करण्यात आली. त्यानंतर भंडाऱ्याचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी अनेक भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी नगरसेविका सौ. गिताजंलीताई सोनू संगेवार, भूषण दमकोंडवार, गजानन कळसकर, रामभाऊ वाले, मारोतराव कळसकर,दिगांबर मार्कडकर, नरेश महामुने,गिरिश गुंजकर, सोमनाथ शिराळे,अथर्व खपले, प्रज्वल वाले, अनिल सनपुरकर यांच्यासहीत मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## जाहिर सूचना

दिनांक : ०३/०४/२०२६

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्क करू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : हंडेवाडी रोड, हडपसर पुणे - ४११०२८, मो ९३७३५०४७४८

(पान १ वरून...)

## आप ने खासदार राघव चड्ढा यांना उपनेतेपदावरून...

केलेल्या कारवाईमुळे या चर्चांमध्ये तथ्य असल्याचं पाहायला मिळत आहे.

तर, चड्ढा यांनी मागील काही काळापासून संसदेत जनतेशी निगडीत महत्त्वाचे प्रश्नांना वाचा फोडल्यामुळे त्यांची सोशल मीडियावर चांगली क्रेझ निर्माण झाली आहे. यामध्ये ब्लिकिंट डिलिव्हरी कर्मचाऱ्यांचा प्रश्न, लोकप्रतिनिधींना माघारी बोलावण्याच्या अधिकार, मोबाईल रिचार्ज अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना हात घातला होता. अशातच आता पक्षाने त्यांच्या बोलण्यावर मर्यादा आणल्यामुळे अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

सुविचार

तुम्ही मला कैद करू शकता, माझा छळ करू शकता, माझे शरीर नष्ट करू शकता. पण माझ्या मनाला कैद करू शकणार नाहीत.

– महात्मा गांधी

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)




# दर्यापूर मतदारसंघात बसपाची चिंतन बैठक

## संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे – जिल्हाध्यक्ष राजू गजभिये यांचे आवाहन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**अमरावती - प्रतिनिधी**
**संजय सरवटकर**




**अमरावती :** दर्यापूर विधानसभा क्षेत्रातील बहुजन समाज पार्टीची महत्वपूर्ण चिंतन बैठक आज अंजनगाव सुर्जी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासह कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर विशेष भर देण्यात आला. या बैठकीला बसपाचे जिल्हाध्यक्ष राजू भाऊ गजभिये, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश भाऊ मेश्राम, जिल्हा सचिव वसंतराव धंदर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य मनोज भाऊ मेळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रा.डी.एन. हिरे, विजयराव रायबोले, भाऊराव वानखडे यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन दर्यापूर विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष विनायकराव सेजे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला दर्यापूर विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष विनायकराव नेजे, प्रा डी एन हीरे विजयराव रायबोले, निरंजन इंगळे, आबाराव इंगळे, चंदनाताई वाहूरवाघ, निलेश घरडे, राहुल इंगळे, हरीश सरदार, सुखदेव इंगोले, चंद्रशील बर्डे, दानभद्र रायबोले, शिवराम सुरजुसे, शेषराव रायबोले, राजेश इंगळे, रवी मोहोळ, अनिल माहोरे, निलेश घरडे, दिपक धंदर गुरुजी, ईश्वरदास वानखडे, हरिश सरदार, नंदकिशोर इंगळे, सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष राजू गजभिये यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना फुले-शाहू-आंबेडकरी विचारसरणी अधिक जोमाने पुढे नेण्याचे आवाहन केले. आगामी निवडणुकांचा विचार करून संघटन मजबूत करण्यावर भर देत, 'कार्यकर्ता हा कॅडर बेसवर काम करणारा असावा, तेव्हाच तो खरा कार्यकर्ता ठरतो,' असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच कार्यकर्त्यांनी मिशनरी वृत्तीने काम करत खोट्या आमिषांना बळी पडू नये, असे सांगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार चळवळ पुढे नेण्यासाठी मान-अपमान सहन करून कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. या बैठकीत संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, तसेच आगामी निवडणुकांसाठी रणनीती ठरविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या चिंतन बैठकीमुळे दर्यापूर विधानसभा क्षेत्रात बसपाच्या कामकाजाला नवचैतन्य मिळणार असल्याचे मत उपस्थितांमध्ये व्यक्त करण्यात आले.

# संग्रामपूर तहसिल पुरवठा विभाग १८ हजार रेशनकार्ड धारकांनवर कारवाई करणार!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**संग्रामपूर - प्रतिनिधी**
**नंदकिशोर शिरसोले**

**संग्रामपूर :** तालुक्यात अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या रेशनकार्डधारकांची अचूक पडताळणी करण्यासाठी 'मिशन सुधार' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. शासनाच्या निर्देशानुसार ही मोहीम सुरू असून अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळून खऱ्या अर्थाने पात्र व गरजू नागरिकांना योजनेचा लाभ मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. संग्रामपूर तालुक्यात तब्बल १८ हजार ५९५ संशयित रेशनकार्ड धारकांवर पडताळणीची प्रक्रिया वेगाने सुरू असून शासनाच्या 'मिशन सुधार' अभियानांतर्गत अन्नसुरक्षा योजनांमधील बोगस व अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई करण्यास प्रशासनाने सुरुवात केली आहे.

शासनाकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार तालुक्यातील रेशनकार्डांची तपासणी सुरूआहे. या मोहिमेत विविध निकषांवर छाननी केली जात असून त्यामध्ये अन्नसुरक्षा दीर्घकाळ धान्य न घेणारे ५४० कार्डधारक, दोन ठिकाणी नोंद असलेले १६८, आयकर भरणारे ४२३ , दोन एकरांपेक्षा अधिक शेती असलेले १७०३७ लाभार्थी, कंपनीचे मालक अथवा संचालक ११४, जादा उलढाल ३, वाहनधारक तसेच आधार संलग्नतेबाबत संशयित आधार नोंदी १२६, १०० वर्षावरील सदस्य १७७,१८ वर्षांखालील सदस्य ७,आधार संशयित प्रकरणे, मय्यत लाभार्थी आदींसह १८ हजार ५९५ संशयित रेशनकार्ड धारकांवर समावेश आहे. संबंधित

> **प्रतीक्रिया : संग्रामपूर तालुक्यात मिशन सुधार अंतर्गत १८ हजार ५९५ रेशनकार्ड धारकांची तपासणी होत असून प्रत्येकाचे उत्पन्न व आर्थिक व्यवहार ऑनलाइन पडताळले जात आहेत.नागरिकांनी स्वतःहून कार्ड जमा करून पांढरे कार्ड घ्यावे अन्यथा कारवाई करण्यात येणार आहे.**
>
> **कोमल रोडे**
> **पुरवठा निरीक्षण अधिकारी संग्रामपूर**

याद्यांनुसार अपात्र लाभार्थ्यांची ओळख पटवून आरसीएमएस (RCMS) प्रणालीद्वारे नियमानुसार त्यांना अन्नसुरक्षा योजनेतून वगळण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मोफत धान्य वितरणात गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. त्यानंतर शासनाने आधार, पॅन आणि बँक खात्यांची लिंकिंग प्रक्रिया पूर्ण केली. या ऑनलाइन पडताळणीत अनेक विसंगती समोर आल्या असून बनावट लाभार्थ्यांचा शोध घेण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. तपासणीदरम्यान अनेक प्रकार समोर आले आहेत. दीर्घकाळ धान्य न घेणारे रेशनकार्डधारक, दोन ठिकाणी नोंद असलेले कार्ड, आयकर भरणारे नागरिक, दोन एकरांपेक्षा अधिक शेती असलेले, कंपन्यांचे मालक-संचालक, चारचाकी वाहनधारक, संशयित आधार नोंदी, मृत व्यक्तींची नावे तसेच १०० वर्षांवरील व १८ वर्षांखालील नावांचा समावेश असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

ग्रामीण भागातील प्राधान्य कुटुंबासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ४४ हजार रुपये, तर शहरी भागासाठी ५९ हजार रुपये निश्चित आहे. मात्र विविध योजनांमधून मिळणाऱ्या लाभांची ऑनलाइन पडताळणी करताना अनेक जण अपात्र ठरत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अशा संशयित लाभार्थ्यांची नावे अन्नसुरक्षा यादीतून वगळण्यात येणार असून आरसीएमएस प्रणालीद्वारे पुढील कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, या कारवाईमुळे खऱ्या पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळणार असून रेशन वितरणातील गैरप्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या कारवाईमुळे अपात्र नावे कमी होऊन पात्र व गरजू (गोरगरीब) नागरिकांना धान्याचा लाभ अधिक पारदर्शक, प्रभावी आणि योग्य पद्धतीने मिळण्यास मदत होणार आहे. तसेच शासनाच्या योजनांमधील गळती रोखून वितरण व्यवस्थेत शिस्त व पारदर्शकता येणार असल्याचे सांगण्यात आले आले आहे.

# रिसोड नगर परिषदेत कर घोटाळ्याची चर्चा तीव्र; प्रेस कॉन्फरन्स का नाही?

## अहवाल असूनही कारवाईवर प्रश्नचिन्ह

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**रिसोड - प्रतिनिधी**
**विजय जुंजारे**

**रिसोड :** शहरातील नगर परिषदेत कर वसुलीमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार लाखोंच्या घरात आर्थिक घोटाळा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, मात्र नेमकी रक्कम किती, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही अधिकृत माहिती दिली जात नाही. कर वसुली प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे आरोप समोर येत आहेत. नागरिकांकडून कर स्वीकारल्यानंतर अधिकृत पावत्या दिल्या जातात, परंतु नंतर त्या पावत्या संगणकीय नोंदीतून रद्द केल्या जात असल्याची बाब समोर येत आहे. त्यामुळे नागरिकांनी भरलेला पैसा नेमका कुठे गेला, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रक्रियेत कनिष्ठ कर्मचाऱ्यांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सहभाग असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी चौकशी समिती नेमल्याचे सांगितले जात असले तरी, अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. 'अहवाल गोपनीय आहे' असे कारण देत तो दडवला जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला आहे. अहवाल तयार झाला असल्याची चर्चा असतानाही नगर परिषद रिसोड प्रशासनाने आजपर्यंत अधिकृत प्रेस कॉन्फरन्स का घेतली नाही? हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, अहवाल आल्याची माहिती समोर येत असतानाही दोषींवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली दिसत नाही. अहवाल असूनही कारवाई का केली जात नाही? नगर परिषद प्रशासन कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे का, असा संशय नागरिक व्यक्त करत आहेत. या संपूर्ण प्रकरणावर मुख्याधिकारी मौन बाळगून असल्याने त्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भ्रष्टाचार उघडकीस येऊनही अधिकृत स्पष्टीकरण न देणे आणि कोणतीही कारवाई न करणे, यामुळे प्रशासनाची पारदर्शकता संशयात आली आहे.

नगर परिषदेत कर भरल्यानंतर पावत्या रद्द केल्या जात असल्याचा आरोप अत्यंत गंभीर असून, यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणात नेमके किती लाखांचा घोटाळा झाला आहे, याची स्पष्ट माहिती देण्यास प्रशासन टाळाटाळ करत असल्याचे चित्र दिसत आहे. रिसोडकर नागरिकांनी आता स्पष्टपणे प्रश्न उपस्थित केले आहेत प्रेस कॉन्फरन्स का घेतली जात नाही? अहवाल सार्वजनिक का केला जात नाही? दोषींवर कारवाई का होत नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने तात्काळ द्यावीत, अन्यथा या प्रकरणावरून मोठा जनआक्रोश उसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# देगलूरमध्ये जय श्रीरामः जय हनुमानःचा जयघोष !

## शहरात भक्तीपूर्ण वातावरणात हनुमान जयंती साजरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**देगलूर - प्रतिनिधी**
**संतोष मंनधरणे**




**देगलूर :** जय श्रीरामः जय हनुमानः अशा जयघोषाने देगलूर शहरात भक्तिमय वातावरण झाले होते. भक्तीपूर्ण वातावरणात हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील अनेक मंदिरामध्ये पहाटेपासून भाविकांनी दर्शनसाठी रांगा लावल्या होत्या. सूर्यदया वेळी उत्साहात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली यावेळी शहरातील कापड बाजार मारुती मंदिर , हॉटेल बेस मारुती मंदिर व साळवान मारुती मंदिर या ठिकाणी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तेलंगाना राज्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले मिर्जापुर हनुमान मंदिर येथील उत्तरमुखी हनुमान मंदिरात भल्या पहाटे हनुमान जयंती भक्तिभावाने साजरी झाली. यानिमित्त पहाटे हनुमानाच्या मूर्तीला महाभिषेक, हनुमान चालीसा पाठ, रामनामाचा जप व आरती करून विधिवत पूजा करण्यात आली.देगलूर तालुक्यात पवनपुत्र हनुमान की जय, बजरंग बली की जय... असा जयघोष तालुक्यातील गावांमध्ये करण्यात आला.

तालुक्याच्या बहुतांशी गावांमध्ये असलेल्या हनुमान व मारुतीच्या मंदिरांमध्ये हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. पहाटे काकड आरती, भजन, सायंकाळी प्रवचन, कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील बहुतांशी गावांमध्ये हनुमान व मारुती मंदिरे आहेत. हनुमान जयंतीनिमित्त या मंदिरांना आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच फुलाहारांची सजावट करण्यात आली होती. मंदिर परिसरात आंब्यांच्या पानांची आंबोती व केळीची झाडे बांधली होती. ग्रामीण भागात हनुमान जयंती असल्यामुळे भक्तांमध्ये अधिक उत्साह दिसून आला.

# कष्ट, जिद्द आणि सातत्याचा विजय बालानगर सह तुपेवाडीच्या युवकाची पोलिस खात्यात निवड



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**आडुळ सर्कल - प्रतिनिधी**
**आकाश साळवे**

**आडुळ सर्कल :** पैठण तालुक्यातील बालानगर परिसरातील तीन युवकांनी पोलिस दलात निवड मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. बालानगर येथील नंदू गणपत राऊत यांची छत्रपती संभाजीनगर शहर पोलिस दलात निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच बालानगर मधीलच रिजवान जानिमिया शेख यांची पालघर जिल्हा पोलिस दलात निवड झाली आहे. त्यांच्या मेहनतीचे फळ मिळाल्याने कुटुंबीयांसह बालानगर ग्रामस्थांमध्ये अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. याचबरोबर तुपेवाडी येथील श्याम कारभारी घोंगडे यांनी अकोला शहर पोलिस दलात स्थान मिळवले आहे. अत्यंत कठीण परिस्थितीतही त्यांनी कष्ट, जिद्द आणि सातत्य टिकवून ठेवत हे यश संपादन केले.

या तिन्ही युवकांच्या यशामुळे ग्रामीण भागातील इतर तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल स्थानिक गावकऱ्यांकडून पोलिस दलात निवड झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला व तसेच त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्या देण्यात आल्या.

# खरीपहंगाम २०२६ करिता युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठ्या करिता कृषीमंत्र्याची बैठक संपन्न



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**वैजापूर - प्रतिनिधी**
**अनिल सूर्यवंशी**

**वैजापूर :** खरीपहंगाम २०२६ करिता युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठा एप्रिल व मे महिन्यात तयार ठेवण्याचे काटेकोर नियोजन कृषी विभागाने करावे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत खतांची कमतरता भासणार नाही याची दक्षता घ्यावी. कोणत्याही कंपनीने किंवा विक्रेत्याने खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती शेतकऱ्यांना करू नये, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील खतांची उपलब्धता आणि नियोजनाचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, संचालक कृषी सुनिल सी. बोरकर यासह विविध खत कंपन्याचे अधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील नागरिकांसाठी मोठी संधी!

## ६ एप्रिलला जिल्हास्तरीय लोकशाही दिन; तक्रार निवारणासाठी प्रशासन सज्ज

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**वाशिम - प्रतिनिधी**
**प्रताप नागरे**

**वाशिम :** जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या तक्रारी व समस्यांचे थेट प्रशासनाकडे मांडणी करून त्वरित निवारण मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजता करण्यात आले आहे. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात पार पडणार आहे.

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या २६ सप्टेंबर २०१२ च्या शासन परिपत्रकानुसार तसेच महिला व बाल विकास विभागाच्या ४ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार, दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. त्यानुसार एप्रिल महिन्यातील हा महत्त्वपूर्ण लोकशाही दिन नागरिकांसाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे. या लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी त्यांच्या तक्रारी किंवा निवेदने विहीत




नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतींमध्ये सादर करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, संबंधित प्रकरणे यापूर्वी तालुका, जिल्हा किंवा महानगरपालिका स्तरावर मांडलेली असावीत. अर्ज लोकशाही दिनाच्या किमान १५ दिवस आधी सादर करणे बंधनकारक आहे. प्रशासनाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व आपल्या समस्या योग्य माध्यमातून मांडून त्यांचे वेळेत व प्रभावी निराकरण करून घ्यावे.

नागरिकांच्या हक्कासाठी, प्रशासन तुमच्या दारी!

# श्याम सवाई यांचा सत्कार, व्यसनमुक्तीच्या कार्याची दखल

## समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून व्यसनमुक्तीचा संदेश देण्याची ग्वाही

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**कारंजा लाड - प्रतिनिधी**
**अशोकराव उपाध्ये**

**कारंजा :** समाजातील व्यसनमुक्ती चळवळीला बळकटी देत उल्लेखनीय कार्य करणारे श्यामभाऊ सवाई यांना महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून 'महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार' प्रदान झाल्यानंतर कारंजात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. ३० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृहात बहुजन पत्रकार संघाच्या वतीने पार पडलेल्या या कार्यक्रमाने सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाचा गौरव करणारा एक प्रेरणादायी क्षण अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्याम सवाई यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी सभागृहात टाळ्यांचा कडकडाट होत सवाई यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात त्यांनी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न, जनजागृती मोहिमा आणि समाजातील युवकांना योग्य दिशेने वळविण्याचे कार्य यामुळे त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. यावेळी तहसीलदार रवी महाले, नायब तहसीलदार विनोद हरणे, लक्ष्मण बनसोडे तसेच मंडळ अधिकारी महेश धानोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, अखिल भारतीय पत्रकार संघाचे सुधीरभाऊ देशपांडे, 'दैनिक देशोन्नती'चे तालुका प्रतिनिधी विजय काळे, 'दैनिक सकाळ'चे अनंत सुपणर, ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक उपाध्ये यांच्यासह विविध माध्यमांचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या भाषणात सवाई यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, आजच्या काळात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असताना अशा सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. सवाई यांनी केवळ जनजागृती केली नाही, तर अनेक कुटुंबांना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढून त्यांना नवजीवन दिले आहे, हे कार्य समाजासाठी आदर्श ठरणारे आहे.

सत्काराला उत्तर देताना श्याम सवाई यांनी नम्रपणे हा सन्मान समाजातील सर्व सहकाऱ्यांचा असल्याचे सांगितले.तसेच व्यसनमुक्त समाज हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे. पुढील काळातही मी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून व्यसनमुक्तीचा संदेश देत राहीन, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच युवकांनी व्यसनापासून दूर राहून शिक्षण व सकारात्मक कार्यात स्वतःला गुंतवावे, असे आवाहनही त्यांनी केले. उपस्थितांनी सवाई यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विजय भड यांनी केले तर आभार हेमंत पापडे यांनी मानले. कार्यक्रमाला तालुक्यातील पत्रकारांची मोठी उपस्थिती होती.




# एकुरका (रोड) येथे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**वाढवणा - प्रतिनिधी**
**संतोष कांबळे**

**वाढवणा :** उदगीर तालुक्यातील एकुरका (रोड) येथे प्रतिवर्षीप्रमाणे या ही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून मित्ती चैत्र क ०१ शके १९४७ शुक्रवार दि.०३/०४/२०२६ ते चैत्र शु ०८ दि.१०/४/२०२६ या काळात साजरा होत आहे. सप्ताहात खालीलप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. त्यात व्यासपीठ प्रमुख श्री.ह. भ. प. बनारस सुकणे (सुकणी), श्री. ह.भ.प. वैजनाथ महाराज एकुरका (रोड ), ज्ञानेश्वरी पारायण, गाथा, भजन, प्रवचन व किर्तन होणार आहेत. चैत्र क्र -०१दि. ०३/०४/२०२६ वार शुक्रवार रात्री ९ ते ११ श्री. ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज एकुर्केकर यांचे कीर्तन होणार असून सकाळचे अन्नदाते सौ. तेजस्विनी हनमंत नरवडे, दुपारच्या अन्नदाते मधुकर बाबुराव जाधव, परुचे अन्नदाते अमोल विनायक शेवाळे, चैत्र क्र.०२ दि. ०४/०४/२०२६ वार शनिवार श्री.ह.भ. प. सूर्याजी महाराज भोसले यांचे रात्री ९ ते ११ किर्तन होणार असून त्या दिवशीचे सकाळचे अन्नदाते ज्ञानेश्वर माधवराव जाधव, दुपारचे अन्नदाते संजय गुणवंतराव पाटील, परूचे अन्नदाते निळकंठ पाटील सुमठाणकर यांचे होणार आहे. चैत्र क्र.०३ दि.०५/०४/२०२६ वार रविवार श्री.ह. भ.प. भास्कर महाराज सांडोळकर यांचे रात्री ९ ते ११ किर्तन होणार आहे. या दिवशीचे सकाळचे अन्नदाते भरत काशीराम जाधव, दुपारच्या अन्नदाते सुनील रावसाहेब पाटील यांचे तर पुढची अन्नदाते सुरेश दौलतराव पाटील यांचे होणार आहे. चैत्र क्र. ०४ दि. ०६/०४/२०२६ वार सोमवार रात्री ९ ते ११ श्री. ह. भ. प. कैलास महाराज मद्दे (लिंगदाळ), यांचे होणार असून त्या दिवशीचे सकाळचे अन्नदाते मोहन शिवराम पांचाळ हे आहेत. तर दुपारच्या अन्नदाते नामदेव नरसिंग कोदळे हे असून परूचे अन्नदाते गणपती पंढरी माने यांचे होणार आहे. चैत्र ०५ दि. ०७/०४/२०२६ या दिवशी रात्री ९ ते ११ किर्तन ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जांभळे अहमदनगर यांचे होणार आहे. त्यादिवशी सकाळचे अन्नदाते माधवराव भगवान माकने हे आहेत. दुपारच्या अन्नदाते मोहन रामराव जाधव यांचे होणार असून परूचे अन्नदाते शिवाजी संग्राम पाटील यांचे होणार आहे. चैत्र क्र. ०६ दि. ०८/०४/२०२६ वार बुधवार रोजी रात्री ९ ते ११ श्री. ह.भ. प. प्रशांत महाराज नांदेड आळंदी देवाची यांचे होणार असून सकाळचे अन्नदाते ज्ञानोबा विठ्ठलराव गुंडरे यांचे तर दुपारचे अन्नदाते शिवराज रामराव जाधव यांचे होणारअसून परुचे अन्नदाते विजयकुमार गुणवंतराव पाटील यांचे होणार आहे. चैत्र क्र ०७ दि. ०९/०४/२०२६ वार गुरुवार या दिवशी रात्री ९ ते ११ श्री.ह.भ.प.माऊली महाराज मुंडेकर गंगोत्री आश्रम गंगाखेड यांचे होणार असून त्या दिवशी सकाळच्या अन्नदाते जगदीश दत्तात्रय जाधव यांच्यातर्फे होणार असून दुपारचे अन्नदाते उत्तम व्यंकटराव शेवाळे यांचे तर परूचे अन्नदाते कालिदास बाबाराव गुंडरे यांचे होणार आहे. आणि अखंड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे चैत्र क्र ०८ दि. १०/०४/२०२६ शुक्रवार रोजी सकाळी ११ ते १ श्री.ह.भ. प. किशन महाराज सांडोळकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन एकुरका (रोड) ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये गायनाचार्य म्हणून बालाजी मुळे (सुकणी), विनायक मोरे (उमरगा) हे असणार आहेत. संगीत कलाकार- अशोक जी महाराज आळंदीकर, रामेश्वरजी महाराज आळंदीकर, मृदंगाचार्य नामदेव महाराज एकुर्केकर, हरी महाराज आळंदीकर हे आहेत. भजनी मंडळ- आनंदाश्रम वारकरी गुरुकुल आळंदी देवाची हे असणार आहेत. तरी समस्त गावकरी मंडळी एकुरका (रोड) येथील समस्त गावकरी मंडळींनी अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे विनीत केले आहे.

# वसमत शहर अंधारात!

## महावितरणच्या निष्काळजीपणामुळे नागरिक त्रस्त -आंदोलनाचा इशारा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**वसमत - प्रतिनिधी**
**बालाजी अडकिने**

**वसमत :** वसमत शहर व ग्रामीण भागात महावितरणच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभारामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. पावसाचा नुसता थेंब पडला तरी वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले असून, देखभालीच्या नावाखाली मात्र कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी, ईद.रामनवमी.हनुमान जयंती.महावीर जयंती.पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती. व इतर सणासुदीच्या काळातही नागरिकांना अंधारातच दिवस काढावे लागत आहेत.

या गंभीर समस्येविरोधात उपविभागीय व तहसीलदार शारदा दळवी मॅडम यांना निवेदन देण्यात आले. यावेळी 'दळवी मॅडम यांनी महावितरणचे अधिकारी नंद साहेब यांना फोनवरून व नंतर प्रत्यक्ष येऊन तोडगा काढावा असे सांगितले. यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुभाष लालपोतु, पत्रकार संघाचे सर्व प्रतिनिधी, व्यापारी वर्ग तसेच इतर त्रस्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**तहसीलदार शारदा दळवी यांना निवेदन;**
**व्यापारी, पत्रकार व नागरिकांचा संताप – आंदोलनाचा इशारा**

**(पावसाचा थेंब = वीज गायब!**
**'बिल भारी, सेवा शून्य!'**
**'महावितरणचा कारभार नागरिकांच्या सहनशक्तीपलीकडे'**

गेल्या काही दिवसांपासून पावसाचे वातावरण निर्माण होताच वीज पुरवठा तातडीने खंडित केला जातो. कोणताही सण किंवा धार्मिक उत्सव असतानाही वीज सुरळीत ठेवली जात नसल्याने 'सण साजरा करावा की अंधारात बसावे?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महावितरणकडून वीज खंडित होण्याचे कारण 'मेंटेनन्स' सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात लोबकळणाऱ्या तारा, जुन्या डीपी आणि ट्रान्सफॉर्मरकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. असे असतानाही ग्राहकांना दरमहा अवाच्या सव्वा वीज बिले पाठवली जात असून, सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे.

वीज गेल्यानंतर तक्रार करण्यासाठी फोन केल्यास कोणताही प्रतिसाद मिळत नाही. कर्मचारी फोन उचलत नाहीत, फोन जर कधी उचलला आणि ग्राहकाकडून लाईट बदल विचार ना केली. तर थेट कर्मचारी यांच्याकडून थोडा वेगळ्या भाषेत उत्तर येते. दुसरीकडे थकीत बिलांच्या नावाखाली सक्तीची वसुली केली जाते. बिल न भरल्यास तातडीने वीज कनेक्शन तोडण्याची कारवाई केली जाते.'आम्ही नियमित बिल भरतो, तरीही पावसाळ्यात तासनतास अंधारात राहावे लागते. तक्रार केली तर कोणी प्रतिसाद देत नाही. हा ग्राहकांचा नाहक छळ आहे.'. निवेदनातील प्रमुख मागण्या:

१) वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण तात्काळ कमी करावे

२) वाढीव व चुकीची बिले दुरुस्त करावीत

३) तक्रार निवारण केंद्र 24x7 सुरू ठेवावे

४) प्रत्येक पाळीत कर्मचारी उपस्थिती बंधनकारक करावी

५) डीपी व लाईनची तातडीने दुरुस्ती करावी

जर या गंभीर समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन तोडगा काढला नाही, तर वसमत शहरातील नागरिक, व्यापारी व विविध संघटना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# आई राजा उदो उदोच्या गजरात भाविकांच्या गर्दीने फुलली येडेश्वरी नगरी

## आजपासून चैत्री उत्सवास प्रारंभ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**येरमाळा - प्रतिनिधी**
**बबलू मुंढे**

**येरमाळा :** बहुजन समाजाचे दैवत आणि तुळजाभवानी मातेची धाकटी बहीण मानल्या जाणाऱ्या येडेश्वरी मातेच्या चैत्र यात्रेला मोठ्या भक्तिभावाने, उत्साही वातावरणात सुरुवात झाली असून, भाविकांनी देवीचा मंदिर परिसर तसेचयेरमाळा नगरी फुलून गेली आहे. दरम्यान, चैत्रीनिमित्त चुनखडी वेचण्याचा कार्यक्रम शुक्रवारी असून, या मानाच्या उत्वसाला अभूतपूर्व गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने यात्रेचे चोख नियोजन केले आहे. भाविकांसह, विविध व्यावसायिक यात्रेसाठी दाखल झाले असून येरमाळा नगरीत मंदिर परिसरात भाविकांची, आराध्यांची पहिल्या पौर्णिमेला म्हणजे बुधवारी गर्दी झाल्याने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. बाहेरगावच्या व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहेत. येडेश्वरी मंदिर, आमराई परिसर, गावातील मुख्य रस्त्याच्या बाजूने हॉटेल, खानावळी, रसवंती फळे, आइस्क्रीम, भांडी, ज्वेलरी,





**प्रशासन सज्ज, पहिल्या पौर्णिमेलाच भाविकांची अफाट गर्दी, पोलीस प्रशासनाचा तगडा बंदोबस्त उद्या चुनखडी वेचण्याचा कार्यक्रम**

कपडे, बॅग, नारळ, खेळणी विक्रेते मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. मुलांसाठी मनोरंजनाची साधनेही दाखल झाली आहेत. आरोग्य विभागाने भाविकांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात दोन, मंदिरात एक, आमराई मंदिर परिसरात दोन असे पाच आरोग्य बूथचे नियोजन केले आहे. त्यासाठी १० डॉक्टर, दहा महिला डॉक्टर, आरोग्य सेवक, सेविका, कर्मचारी, शिपाई, कर्मचारी रुजू झाल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधाकर बिराजदार यांनी सांगितले.

चारही बाजूंनी बस थांब्यांची व्यवस्था पाण्यासाठी २५ टँकर ग्रामपंचायतीकडून पिण्याच्या पाण्याचे २५ टैंकर, १ अग्निशामक बंब सज्ज ठेवला आहे. मंदिर मार्ग, गावातील पथदिवे, पालखी मार्ग गटारांची स्वच्छता करण्यात आली आहे. पाणीपुरवठा सुरळीत राहाण्यासाठी तयारी केली आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर देवस्थान ट्रस्टतर्फे दर्शन रांगेची एकेरी व्यवस्था असेल, मंदिर परिसर, दत्त कल्लोळ परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. दर्शन रांग, पालखी सोहळ्यासाठी ७५ स्वयंसेवकांची नेमणूक आहे.

पोलिसांचा तगडा बंदोबस्त, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी जिल्हा पोलिस प्रशासनाने जड वाहनांची वाह्यवळण व्यवस्था केली आहे. यात्रेदरम्यान बंदोबस्तासाठी ४४ पोलिस अधिकारी, ३५० पोलिस कर्मचारी, १५० महिला पोलिस कर्मचारी, १५० पुरुष होमगार्ड, १५० महिला होमगार्ड तैनात असतील. पोलिस ठाणे हद्दीतील ग्रामसुरक्षा दलालाही मदतीला घेतले जाणार असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पवार यांनी सांगितले.

संपानंतर कामावर हजर होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्याने एसटी बसची सोय मोठ्या प्रमाणात होणार आहे. बसथांब्यांसाठी चार शेडचे नियोजन झाले आहे. बार्शी मार्गे पुणे, मुंबई जाणाऱ्यांसाठी येडेश्वरी मंदिर रस्त्यावर, सोलापूर, लातुर, उस्मानाबादकडे जाणाऱ्यांसाठी बीएसएनएल उपकेंद्राजवळ, भूम, नगर, बीड औरंगाबादकडे जाणाऱ्यांसाठी महामार्गावरील बीज गुणन केंद्राजवळ, केज, धारूर अंबाजोगाईकडे जाणाऱ्यांसाठी चौरस्त्यावरील कळंब रोडच्या पश्चिम बाजूच्या शेतात शेडचे नियोजन आहे. एसटीच्या बस धावणार यात्रेसाठी उस्मानाबाद विभागाने १५०, बीड ८०, लातूर ५० तर बार्शी आगाराच्या २०, कुर्दुवाडी, करमाळा आगाराच्या प्रत्येकी ५ बसची व्यवस्था करण्यात आली आहे. बसथांब्यांच्या (शेड) माहितीसाठी ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावले आहेत, असे जिल्हा वाहतूक अधिकारी अजय पाटील यांनी सांगितले.

# शहरात अतिक्रमणाविरोधात धडक मोहीम

## विविध चौकांतील विक्रेते हटविले, नियमबाह्य बांधकाम थांबविले

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**नांदेड - प्रतिनिधी**
**शिलरतन लोखंडे**

**नांदेड :** नांदेड शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने धडक कारवाई करत व्यापक अतिक्रमणविरोधी मोहीम हाती घेतली. दिनांक १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या मोहिमेत विविध प्रमुख चौकांमधील विक्रेत्यांना हटविण्यात आले असून काही ठिकाणी नियमबाह्य बांधकामही थांबविण्यात आले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उपायुक्त संधू यांच्या आदेशानुसार व उत्तर विभागाचे पथक प्रमुख दत्ता कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. पथकाने सर्वप्रथम नाईक चौक परिसरातील गुंडेगावकर पेट्रोल पंपाजवळ पाहणी केली. या वेळी रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले प्लास्टिक विक्रेते, गॉगल विक्रेते, फळ विक्रेते तसेच अन्य किरकोळ विक्रेत्यांना हटविण्यात आले.



प्रशासनाने शहरातील सर्व प्रमुख चौकांच्या १०० मीटर परिसरात कोणालाही विक्रीस बसण्यास मनाई केली आहे. संबंधित विक्रेत्यांना सूचना देत विविध चौक परिसरातील फळ विक्रेते व इतर विक्रेत्यांना हटविण्याची कारवाई करण्यात आली. राज कॉर्नर परिसरात फुटपाथवर स्टीलचे साहित्य ठेवून अतिक्रमण केलेल्या दुकानदारावरही कारवाई करण्यात आली. दुकानदाराने फुटपाथवर ठेवलेले स्टीलचे साहित्य हटविण्यात आले, तसेच परिसरातील फळ विक्रेत्यांनाही हटविण्यात आले.

दरम्यान, शेतकरी चौक परिसरातही १०० मीटरच्या आत बसलेल्या विक्रेत्यांना हटवून वाहतुकीस मोकळीक देण्यात आली. तसेच मोर चौक येथे सुरू असलेले तार कंपाउंडचे बांधकाम नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ते तात्काळ थांबविण्यात आले. या कारवाईमुळे शहरातील प्रमुख चौकांवरील अतिक्रमण कमी होऊन वाहतुकीस दिलासा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाने पुढील काळातही अशा प्रकारच्या मोहिमा सातत्याने राबविण्याचा इशारा दिला आहे. विशेष म्हणजे, उत्तर विभागाचे पथक प्रमुख म्हणून दत्ता कल्याणकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ड्युटीच्या पहिल्याच दिवशी ही मोहीम यशस्वीरीत्या राबवून प्रभावीपणे कामगिरी केली. त्यामुळे प्रशासनाच्या अतिक्रमणविरोधी भूमिकेला अधिक बळ मिळाले आहे.

# चारही बाजूंनी संकटांचा विळखा

## शेतकरी पुन्हा एकदा हवालदिल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**कंधार - प्रतिनिधी**
**अशोक पाटील तेलंग**

**कंधार :** राज्यातील शेतकरी आज अभूतपूर्व संकटांच्या भोवऱ्यात सापडला असून निसर्गाचा मार, बाजारपेठेतील अन्याय आणि व्यवस्थेतील त्रुटी यामुळे त्याचे जगणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. एका बाजूला अवकाळी पावसामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे, तर दुसऱ्या बाजूला शेतमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

याचबरोबर वीजपुरवठ्यातील लोडशेडिंग आणि बाजारातील वाढती महागाई या संकटांनी त्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या कष्टांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. पिके उभी असताना अचानक आलेल्या पावसामुळे ती जमिनदोस्त झाली. ज्या पिकातून उत्पन्नाची आशा होती, तेच पीक हातातून निसटल्याने शेतकरी पूर्णपणे खचला आहे. काही ठिकाणी गारपिटीनेही मोठे नुकसान झाले आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांत फक्त हताशा आणि अश्रू दिसत आहेत.

या संकटात भर म्हणजे बाजारपेठेतील विरोधाभासी परिस्थिती. शेतकरी आपला माल बाजारात विकायला जातो तेव्हा त्याला अत्यंत कमी दर मिळतो. कांदा, भाजीपाला, धान्य यांसारख्या उत्पादनांना शेतकऱ्यांना खर्चही निघणार नाही असा भाव मिळतो. पण हाच माल शहरातील बाजारपेठेत पोहोचला की त्याचे दर गगनाला भिडलेले दिसतात. सामान्य ग्राहक महागाईमुळे त्रस्त आहे, पण या महागाईचा फायदा मात्र शेतकऱ्याला मिळत नाही. मधल्या साखळीत असलेल्या दलाल आणि व्यापाऱ्यांमुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे.

'शेतातून निघताना आमचा माल कवडीमोल असतो, पण बाजारात तोच माल सोन्याच्या भावाने विकला जातो,' अशी वेदनादायक प्रतिक्रिया अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना – खते, बियाणे, औषधे आणि इंधन यांचे दर प्रचंड वाढले आहेत. त्याच्या तुलनेत मिळणारा भाव अत्यंत अपुरा ठरत आहे.

त्यामुळे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबत चालला आहे. याशिवाय वीजपुरवठ्याची अनियमितता ही आणखी एक मोठी समस्या ठरत आहे. लोडशेडिंगमुळे पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. रात्रभर शेतात थांबून पाणी देण्याचा प्रयत्न करूनही वीज कधी येईल याचा ठावठिकाणा नसतो. परिणामी पिकांची वाढ खुंटते आणि उत्पादन घटते.

या सर्व परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडत आहे, तर मानसिकदृष्ट्याही खचत चालला आहे. कष्ट करूनही योग्य मोबदला मिळत नसल्याची भावना त्याच्या मनात घर करून बसली आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत गरजा भागवणेही अवघड झाले आहे.

शासनाने या गंभीर परिस्थितीकडे तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक आहे. शेतमालाला हमीभाव, थेट शेतकरी–ग्राहक साखळी निर्माण करणे, दलालांची साखळी कमी करणे, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत देणे गरजेचे आहे. तसेच वीजपुरवठा सुरळीत करून शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजची परिस्थिती शेतकऱ्याच्या सहनशक्तीची परीक्षा पाहणारी आहे.

'अन्नदाता' असलेला शेतकरीच जर संकटात सापडला, तर देशाच्या अन्नसुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होईल. त्यामुळे आता केवळ आश्वासने नव्हे, तर ठोस कृतीची गरज आहेकारण शेतकरी वाचला तरच देश टिकेल.

# मंठा पोलिसांकडून अवघ्या दोन तासांत चोरीचा गुन्हा उघड; तीन आरोपी जालना येथून ताब्यात

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**

**जालना (मंठा) :** पोलिसांनी चोरी व तोडफोडीचा गुन्हा अवघ्या दोन तासांत उघडकीस आणत तीन आरोपींना जालना येथून ताब्यात घेत मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात एक आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रल्हाद श्रीमंतराव शिरसाट (वय ४८, रा. केंधळी, ता. मंठा, जि. जालना) यांनी मंठा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. ३१ मार्च रोजी दुपारी सुमारे १.३० ते २ वाजण्याच्या दरम्यान विठ्ठल रखुमाई मंगल कार्यालयासमोर उभी असलेल्या त्यांच्या महालक्ष्मी ट्रॅव्हल्सच्या वाहनाची अज्ञात व्यक्तींनी कोयत्याने काचा फोडून तोडफोड केली. त्यानंतर गाडी क्रमांक NL01B1813 मधील अंदाजे २५ हजार रुपये किंमतीच्या दोन जुन्या वापरातील बॅटऱ्या चार अज्ञात इसमांनी काळ्या स्कॉर्पिओमधून येऊन चोरून नेल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसून आले. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३७/२०२६ अंतर्गत भारतीय




न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ३२४(४), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनास्थळावरील सीसीटीव्ही व व्हिडिओ फुटेजच्या आधारे पोलिसांनी गोपनीय माहितीदाराच्या मदतीने तपास सुरू केला. फुटेजमध्ये दिसणारे आरोपी जालना येथील असल्याची माहिती मिळताच पोलिस पथक तात्काळ जालना येथे रवाना झाले.

पोलिसांनी अवघ्या दोन तासांत शिताफीने तीन आरोपी व काळी स्कॉर्पिओ ताब्यात घेतली. चौकशीत आरोपींची नावे पुढीलप्रमाणे निष्पन्न झाली

–ओमकार भगवान काळे (वय २८, रा. पाटोदा, ता. मंठा)

अविनाश अंकुश वाघमारे (वय २५, रा. माळीपुरा, गांधीचमन, जालना)

वैभव सत्यप्रकाश गव्हाणे (वय १९, रा. जालना)

तिघांना काळ्या स्कॉर्पिओसह ताब्यात घेऊन मंठा पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

या गुन्ह्यातील यशराज सतीश खांडेभराड (रा. जालना) हा आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनी पुरुषोत्तम देशमुख, सपोनी ईधाटे, पोउपनि केंद्रे तसेच पथकातील सुक्रे, हराळ, बनकर व मदने यांनी केली.



# नातेपुतेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाचा भव्य शुभारंभ; समता, बंधुता आणि विचारांची जागर

## पत्रकार सन्मानाने महोत्सवाची सुरुवात; चौदा दिवस विविध सामाजिक, वैचारिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माळशिरस - प्रतिनिधी
राजेंद्र पिसे

**नातेपुते :** ज्या चळवळीचे मुखपत्र नसते, ती चळवळ पंख तुटलेल्या पक्षांप्रमाणे असते, या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करत नातेपुते येथे जयंती महोत्सवाची उत्साहात सुरुवात करण्यात आली. १ एप्रिल रोजी शहरातील पत्रकार बांधवांचा सन्मान करून महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज उद्धारासाठी व अन्यायाविरुद्ध लढा देताना 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' यांसारखी मुखपत्रे चालवून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्या स्मरणार्थ पत्रकार सन्मानाने महोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन पत्रकार समीर सोरटे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी संघर्ष सोरटे होते.

दिनांक १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत जयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक, वैचारिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे



आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी पोपट साळवे, प्रा. संभाजी बनसोडे, खरे सर, मधुकर वनसाळे, दुर्योधन कसबे, दादासाहेब खरात, बशीर काझी, पत्रकार विलास भोसले, प्रमोद शिंदे, अभिजित म्हामने, सुनिल ढोबळे, राजेंद्र पिसे, सुनिल ओव्हाळ, सचिन झेंडे, हेमंत उराडे, एन. के. साळवे, युवराज वाघमारे, शिवाजी सावंत, नवाज सोरटे, श्रावण सोरटे, बादल सोरटे, दत्ता सोरटे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संघर्ष सोरटे, अभिषेक साळवे, विशाल सोरटे, आप्पा सावंत, वैभव सोरटे, विशाल साळवे, बंटी सोरटे, रवी वाघमारे, क्षितिज सोरटे, शब्बीर शेख, राहुल सोरटे, आदर्श सोरटे, राज साळवे, प्रीतम साळवे, अक्षय सावंत, सोमा भोसले, राकेश सोरटे, निखिल सोरटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

महोत्सवांतर्गत १ एप्रिल रोजी पत्रकार सन्मान, २ एप्रिल प्रश्नमंजुषा, ३ एप्रिल 'माझा करिअर कट्टा', ४ एप्रिल 'जयभीम वाला नवरा' हा मनोरंजनात्मक कार्यक्रम, ५ एप्रिल भीमकन्या कडुबाई खरात यांचा भीमगीतांचा कार्यक्रम, ६ एप्रिल 'जयभीम पँथर' चित्रपट प्रदर्शन, ७ एप्रिल भव्य रक्तदान शिबिर, ८ एप्रिल गायक विजय सरतापे यांचा कार्यक्रम, ९ एप्रिल गायक साजन बेंद्रे व विशाल चव्हाण यांचे भीमगीतांचे सादरीकरण, १० एप्रिल सर्वरोग निदान व मोफत पाईल्स तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले जयंतीनिमित्त अभिवादन सभा व सुप्रसिद्ध वक्ते सुकुमार कांबळे (सांगली) यांचे व्याख्यान होणार आहे. १२ एप्रिल रोजी महिलांसाठी 'होम मिनिस्टर' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

१३ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचा देखावा, भीमजल्लोष तसेच मध्यरात्री १२ वाजता अभिवादन व बुद्धवंदना होणार आहे. तर १४ एप्रिल रोजी सकाळी भव्य मोटारसायकल समता रॅली, अभिवादन सभा आणि सायंकाळी जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीने महोत्सवाची सांगता होणार आहे. या महोत्सवामुळे नातेपुते परिसरात सामाजिक जागरूकता, समता आणि बंधुतेचा संदेश अधिक दृढ होणार असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

# विंझर येथील विद्यार्थ्यांना पारितोषिक आणि शिष्यवृत्तीचे वाटप

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रायगड - प्रतिनिधी

**राजगड :** येथील समाज शिक्षण मंडळ विंझर संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेजच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इयत्ता १० वी, ११ वी आणि १२ वी मध्ये गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांसह अमृतेश्वर महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान अशा तीनही शाखांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापुरकर आणि पुण्यातील एच व्ही देसाई महाविद्यालयाचे माजी प्राचार्य. डॉ. ए.पी कुलकर्णी यांचे हस्ते रोख रक्कम, पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विंझर येथील शैक्षणिक संकुलामध्ये नुकतेच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम प्रसंगी बोलताना रवींद्र शिंगणापुरकर म्हणाले कि, विद्यार्थ्यांनी नेहमीच आयुष्यात चांगले व वेगळे करून दाखविले पाहिजे तसेच आपला रोजचा वेळ केवळ मोबाईलवर न घालवता तो पुस्तक वाचनात घालून आदर्श जीवन निर्माण केले पाहिजे.



तर डॉ. ए.पी कुलकर्णी आपले विचार मांडताना म्हणाले की, नवीन शिक्षण धोरण विद्यार्थीवर्गाला जीवन जगत असताना उपजीविकेचे शिक्षण देणार आहे त्याचा त्यांनी अंगीकार केला पाहिजे तसेच विद्यार्थीवर्गाने नेहमी कोणता ना कोणता निर्णय घेतला पाहिजे, निर्णय घेतल्याशिवाय आपली प्रगती होणे अवघड आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव लाटे यांनी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत व सत्कार केला.

या कार्यक्रमाचे नियोजन माजी न्यायमूर्ती माधव जानू बोरगे, समाज शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष प्रदीप काका फडके, महाविद्यालयातील प्रा. डॉ. महादेव डोंगरे आणि प्रा. डॉ. विजय कदम या सर्वांच्या परिवाराकडून देण्यात आलेल्या देणगीमधून करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप काका फडके हे होते तर संस्थेचे सचिव अशोक भुरक कोषाध्यक्ष यशवंत गायकवाड, संस्थेचे माजी संचालक हनुमंतराव लिम्हण, प्रा. डॉ. महादेव डोंगरे, प्रा. डॉ. विजय कदम आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये आजी माजी विद्यार्थी व पालक यांचेसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. सुरेश मुळूक यांनी कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक म्हणून काम पहिले तसेच प्रास्ताविक केले. यावेळी डॉ.बाळासाहेब केंदळे व डॉ. महादेव डोंगरे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रितेश वांगवाड यांनी केले तर डॉ. राहुल कांबळे यांनी आभार मानले.

# बांधकाम कामगारांसाठी विविध योजना; सर्व सेवा पूर्णपणे मोफत

## अनधिकृत एजंटांकडून फसवणुकीपासून सावध राहा - प्रशासनाचे आवाहन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अर्धापूर - प्रतिनिधी
मन्मथ भुस्से

**अर्धापूर :** दि.२ एप्रिल महाराष्ट्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी कामगारांची नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण तसेच विविध योजनांसाठी अर्ज प्रक्रिया MAHABOCW.IN या अधिकृत संकेतस्थळावरून करण्यात येते. या संकेतस्थळावरील सर्व सेवा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहेत.

दरम्यान, काही मध्यस्थ, एजंट किंवा दलाल कामगारांकडून अर्ज




भरून देण्याच्या नावाखाली अनधिकृत शुल्क आकारत असल्याचे तसेच लाभाच्या रकमेपैकी टक्केवारी घेत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. ही बाब कामगारांची फसवणूक व आर्थिक शोषण करणारी असून गंभीर स्वरूपाची आहे.

**कामगारांसाठी महत्त्वाच्या सूचना**

- MAHABOCW पोर्टलवरील सर्व सेवा पूर्णपणे मोफत आहेत.
- कोणत्याही एजंट किंवा मध्यस्थाला पैसे देऊ नयेत.
- अर्ज स्वतः किंवा अधिकृत सेवा केंद्र (CSC / सेतू केंद्र) मार्फतच करावा.
- लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली पैसे मागणाऱ्यांवर विश्वास ठेवू नये.
- अशा व्यक्तींची माहिती तात्काळ कामगार विभागाकडे द्यावी.
- आधार क्रमांक, बँक तपशील, जढझ यांसारखी गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये.

**एजंट / मध्यस्थांसाठी इशारा**

शासनाच्या योजनांबाबत चुकीची माहिती देऊन कामगारांची दिशाभूल करू नये. कामगारांची फसवणूक, आर्थिक शोषण किंवा बनावट अर्ज केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तक्रार आल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाहीही केली जाईल. कामगारांना नोंदणी, नूतनीकरण व अर्ज प्रक्रिया सोप्या भाषेत समजावून सांगणारी माहिती देखील उपलब्ध करून देण्यात आली असून, कामगारांनी ती पाहूनच अर्ज करावा व दलालांच्या भुलथापांना बळी पडू नये, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांनी केले आहे.

# केंद्रीय प्राथमिक शाळा सदर बाजार हिंगोली येथील आदर्श शिक्षिका रेणुका देशपांडे यांचा ३८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर भव्य सत्कार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
हिंगोली - प्रतिनिधी
देवरत्न गव्हाणकर

**हिंगोली :** शिक्षण क्षेत्रात तब्बल ३८ वर्ष आणि ०४ महिने ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या आणि राज्य शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्काराच्या मानकरी सौ. रेणुका रवींद्र देशपांडे, यांचा सेवानिवृत्ती निमित्त भव्य सत्कार सोहळा नुकताच पार पडला हिंगोली येथील केंद्रीय प्राथमिक शाळा सदर बाजार येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**प्रमुख पाहुण्यांचे गौरवोद्गार**

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून राज्य शासनाचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराचे मानकरी डॉक्टर विजय



निलावार, हे उपस्थित होते, यावेळी बोलताना ते म्हणाले की, रेणुका देशपांडे या खऱ्या अर्थाने एक आदर्श शिक्षिका आहेत. मी या शाळेत मी साठ वर्षांपूर्वी प्राथमिक शिक्षण घेतले आणि ज्या शाळेत राज्याची माजी प्रधान मुख्य सचिव अरुण बंगिरवार शिकले त्याच शाळेत रेणुका ताई सारख्या समर्पित शिक्षिकेचा सेवानिवृत्ती सोहळा होणे ही अभिमानास्पद बाब आहे त्यांच्या देशपांडे यांना पुढील आयुष्यातही शाळेला मार्गदर्शन करत राहण्याची विनंती केली आहे.

**रेणुका देशपांडे यांच्या भावना.**

सत्काराला उत्तर देताना सौ सौ रेणुका देशपांडे, भाऊ झाल्या होत्या. माझ्या सेवाकाळात मी आणि माझे पती रवींद्र देशपांडे यांनी केलेले विद्यादान हे आमच्या कुटुंबासाठी सुख शांती आणि समाधान देणारे ठरले आहे आजवर लाभलेले सहकारी आणि विद्यार्थ्यांच्या सदिच्छामुळेच हा प्रवास यशस्वी होऊ शकला असे त्यांनी मत त्यावेळी व्यक्त केले आहे.

**याप्रसंगी विविध मान्यवरांची उपस्थिती**

केंद्रप्रमुख सरासरी आसोले, व मुख्याध्यापक हरिभाऊ सोनवणे, आत्माराम जाधव (माळहिवरा) श्रीमती- आर.एस.सुगंधी (खानापूर) आर.बी. जाधव, (बासंबा), जी. बी. क्षीरसागर व नरसिंग मोरे इतर कार्यालयीन कर्मचारी.

तसेच याप्रसंगी मोठ्या संख्येने शिक्षक वृंद ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# जळगाव जामोदमध्ये गॅससाठी रांगाच रांगा

## सर्व्हर डाऊनमुळे ग्राहकांचे ऐन उन्हात हाल..!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जळगाव जामोद - प्रतिनिधी
विनोद वानखडे

**जळगाव जामोद :** दिनांक १ एप्रिल रोजी जळगाव जामोद शहरात गॅस सिलिंडरसाठी तालुक्यातील नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. पहाटे ४ वाजेपासूनच गॅस एजन्सीसमोर सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे विदारक चित्र आज पाहायला मिळाले. एकीकडे कडाक्याचे ऊन आणि दुसरीकडे तांत्रिक बिघाड अशा कात्रीत सामान्य जनता अडकली आहे. आज सकाळपासूनच इंडियन ऑईलचे (IOCL) सर्व्हर डाऊन झाल्याने वितरण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. सर्व्हर बंद असल्यामुळे गॅस एजन्सीला सिलिंडरचे बुकिंग आणि वितरण करणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य झाले.




याचा फटका शेकडो ग्राहकांना बसला. पहाटे ४ वाजता, जेव्हा सूर्यही उगवला नव्हता, तेव्हापासून हातातील कामे सोडून नागरिक एजन्सीवर रांगेत उभे होते. मात्र, तासनतास उलटूनही सर्व्हर सुरून झाल्याने नागरिकांचा संयम सुटत चालला आहे. सध्या विदर्भात उन्हाचा पारा चांगलाच चढलेला आहे. दुपारच्या वेळी नागरिक उन्हात बसून लाहीलाही होत आहेत. त्यातच गॅस एजन्सी परिसरात पिण्याच्या पाण्याची साधी व्यवस्थाही नसल्याने ग्राहकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिला तासनतास उन्हात ताटकळत उभ्या असल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.सर्व्हर बंद पडल्याची पूर्वसूचना नसल्याने नागरिकांनी गर्दी केली. एवढ्या मोठ्या रांगा असतानाही एजन्सीकडून पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय करण्यात आली नाही. सकाळपासून रांगेत उभे राहूनही शेवटी रिकाम्या हाताने परत जाण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे.

'आम्ही पहाटेपासून चहा-नाश्ता न करता इथे रांगेत उभा आहोत. घरचा गॅस संपलाय, स्वयंपाक कसा करायचा हा प्रश्न आहे. वरून उन्हाचा त्रास होतोय आणि इथे प्यायला पाणीही मिळत नाहीये. प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे.'


प्रसाद कोथळकर, जळगाव जामोद

डिजिटल इंडियाच्या गप्पा मारल्या जात असल्या तरी, एका सर्व्हरमुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेचे जगणे कसे मुश्किल होऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे. आता गॅस एजन्सी चालक आणि संबंधित कंपनी यावर काय तोडगा काढतात आणि नागरिकांना दिलासा मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# शास्त्रीय गायन परीक्षेत 'प्रथमेश दत्तात्रय जायेवार' विशेष श्रेणीत उत्तीर्ण

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कुंडलवाडी - प्रतिनिधी
श्रीनिवास नरावाड

**कुंडलवाडी :** केंद्रीय विद्यालयात पाचवीत शिकणारा विद्यार्थी (मारोती जायेवार मुकादम यांचा नातू) प्रथमेश दत्तात्रय



जायेवार याने अखिल भारतीय गान्धर्व महाविद्यालय मंडळ, मिरज (मुंबई) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ या सत्रातील प्रवेशिका प्रथम गायन परीक्षेत धर्माबाद केंद्रातून सर्वप्रथम क्रमांक मिळविला आहे. या यशाबद्दल केंद्र संचालक बालाजी सुवर्णकार सर, नामदेव फुलारी सर, दिगंबर गुरुजी, तुकाराम बेल्लुरवाड, दत्तात्रय बोलचटवार (मनुरकर सर), शंकर जायेवार, चंद्रमणी सर, गंगाधर तोटावार, भीम पोतनकरआदींनी त्याचे कौतुक करून अभिनंदन केले.

# पारधेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
औसा - प्रतिनिधी
जीवन जाधव

**औसा :** औसा तालुक्यातील पारधेवाडी: येथे वारकरी संप्रदायाच्या भक्ती परंपरेत अत्यंत महत्त्वाचे मानला जाणारा अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सह रामकथा आयोजीत करण्यात आली होती, पारधेवाडी येथे राम नवमी ते हनुमान जयंती सात दिवसांच्या कालावधीत यशस्वीपणे संपन्न झाला. शेवटच्या दिवशी ह.भ.प. रामायनाचार्य गहनिनाथ महाराज गोमदे यांच्या भक्तीपुर्ण काल्याच्या कीर्तनाने या धार्मिक सोहळ्याचा दिमाखदार समारोप झाला.

पारधेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताह वारकरी संप्रदायातील सामूहिक उपासना पद्धतीचा एक भाग आहे, ज्यात सात दिवस संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंतच्या अभंगांवर तत्वचिंतन आणि हरिनाम जप केला जातो. पारधेवाडीतील हा सोहळा स्थानिक पातळीवर आयोजित असून, सप्ताहात सकाळी काकडा आरतीपासून सुरूहोऊन ग्रंथपालखी मिरवणूक आणि महाप्रसाद वाटपापर्यंत पोहोचला. या सप्ताहात महाराष्ट्रभरातील नामवंत कीर्तनकारांनी सहभाग घेतला, ज्यामुळे भाविकांमध्ये ईश्वरनामाचे महत्त्व अधोरेखित झाले.

पारधेवाडी येथील भुमीपुत्र बालाजी साखरे यांनी यावेळी गावातली लेक मातासाठी येणाऱ्या पुढच्या वर्षी सप्ताहाच्या निमित्ताने भेट वस्तू देण्याचे घोषित केले. तसेच सर्वांनी हनुमान



## ह.भ.प. गहनिनाथ महाराज गोमदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता

चालीसा पाठांतर करावे यासाठी बालाजी साखरे यांनी पारधेवाडी ग्रामस्थांना हनुमान चालीसा पुस्तक देणार असल्याचे यावेळी सांगितले.

पारधेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाला गावातील ३ व्या वर्षी साजरा झाला असून, यंदा मोठ्या उत्साहात पार पडला. ह.भ.प. गहनिनाथ महाराज गोमदे यांचे काल्याचे कीर्तन ऐकून भाविकांच्या मनाला भक्तीचा स्पर्श झाल्याने काल्याच्या कीर्तनात भगवान श्रीकृष्णांच्या लीलांचे वर्णन करत दही-लाह्यांचा प्रसाद वाटप करण्यात आला, यावेळी ग्रंथ शोभा यात्रेत पुरुष, महिला भाविकांनी फुगड्या खेळत आनंदोत्सव साजरा केला. या सोहळ्याचे कारण म्हणजे वारकरी परंपरेत हरिनामाच्या अखंड जपाद्वारे मनुष्य जन्माचे ईश्वरनामाशी नाते जोडणे. पारधेवाडीसारख्या ग्रामीण भागात असे कार्यक्रम गावकऱ्यांना धार्मिक एकतेचा अनुभव देतात आणि सामाजिक सुसंवाद वाढवतात.

या सप्ताहाचा परिणाम म्हणजे शेकडो भाविकांचा सहभाग आणि गावात सकारात्मक अखंड हरिनाम सप्ताह महाराष्ट्राच्या धार्मिक वारशाचे प्रतीक आहे, ज्यामुळे भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा मिळते. अशा सोहळ्यांप्रमाणे पारधेवाडीतील हा सप्ताह यशस्वी झाल्याने स्थानिक वारकरी संप्रदायात समाधान व्यक्त केले जात आहे. यावेळी सरपंच हणमंत जाधव, सरपंच गणपती कानडे, महंत सागरनाथ महाराज, जयहिंद शिंदे, बस्वराज साखरे, तंटामुक्ती अध्यक्ष विश्वास साखरे, मच्छिंद्र महाराज साखरे, अरुण कवे, जनक भडके, दयानंद तांबोळकर, धोंडिराम कवे, बंकट कवे, शेखराव कवे, विवेकानंद साखरे, प्रशांत जाधव, राम साखरे, गोरक पवार, विक्रम कवे, राजेंद्र साखरे, शिवाजी पवार, हणमंत जाधव, अभिमन्यु कवे, महेश जाधव, सौ सुवर्णा कवे, जयाबाई शिंदे, मिनाबाई शिंदे, महानंदा भडके, सुंदरबाई गायकवाड, तसेच गावातील लहान थोर भविक भक्त व पारधेवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बालानगरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी संतोष साळवे पुन्हा अध्यक्षपदी तर लक्ष्मण पटेकर यांची उपाध्यक्षपदी एकमताने निवड

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
आडुळ सर्कल - प्रतिनिधी
आकाश साळवे



**आडुळ सर्कल :** पैठण तालुक्यातील बालानगर येथे दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल) निमित्त नियोजन बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत सर्व समाजाच्या वतीने एकमताने संतोष कृष्णा साळवे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली, तर उपाध्यक्षपदी लक्ष्मण भाऊसाहेब पटेकर यांची निवड करण्यात आली. मागील वर्षीप्रमाणेच यंदाही संतोष साळवे व लक्ष्मण पटेकर यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली असून त्यांच्या नेतृत्वावर समाजाने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. बैठकीत जयंती मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध आणि भव्य स्वरूपात साजरी करण्याचा ठाम निर्धार करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष संतोष साळवे यांनी सांगितले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. जयंती हा केवळ उत्सव नसून प्रेरणेचा दिवस आहे, त्यामुळे प्रत्येक कार्यक्रम शिस्तीत व अनुशासनात पार पडेल यावर भर दिला जाईल. बैठकीत मिरवणूक, व्याख्यानमाला, रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान, तसेच विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. यामुळे जयंतीला सामाजिक बांधिलकीची जोड मिळणार आहे. या बैठकीस समाजातील ज्येष्ठ मंडळी, तरुण कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांच्या सहभागामुळे यंदाची जयंती अधिक उत्साहपूर्ण आणि आदर्श ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# विदर्भातील आधुनिक अनाथपिंडक शरद चौरपगार यांचा महासंकल्प

## २०० बुद्ध विहारांत ई-लायब्ररी, व्यायामशाळा व भिक्खू निवास उभारणार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती - प्रतिनिधी
संजय सरवटकर



**अमरावती :** विदर्भात धम्मसेवा, ज्ञानदान आणि सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय लिहिला जात असून, विदर्भातील आधुनिक अनाथपिंडक म्हणून ओळखले जाणारे शरद चौरपगार यांनी बुद्ध धम्माच्या प्रसारासाठी उल्लेखनीय कार्य उभारले आहे. आजपर्यंत त्यांनी ५४ बुद्ध विहारांना लाखो रुपयांचे धम्मदान दिले असून, २६ बुद्ध विहारांमध्ये अत्याधुनिक ई-लायब्ररी उभारल्या आहेत. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवकांना ज्ञान व अध्ययनाची नवी दिशा मिळत आहे.

दरम्यान, अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शिवर येथे त्यांच्या संकल्पनेतून भव्य, दिव्य आणि अत्याधुनिक बुद्ध विहार उभारण्यात येणार आहे. या विहारात डिजिटल ई-लायब्ररी, ध्यान साधना केंद्र, भिक्खू निवास, मेडिटेशन हॉल, वाचनालय व व्यायामशाळा अशा सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच, युवकांसाठी प्रशिक्षण केंद्र, बौद्ध उपासक-उपासिकांसाठी प्रशिक्षण केंद्र, ध्यान साधना केंद्र व भिक्खू निवास केंद्र उभारण्याचाही महासंकल्प शरद चौरपगार यांनी व्यक्त केला आहे.

याचबरोबर, आपल्या मूळ गावी शिवर येथे बाळासाहेब चौरपगार यांनी दिलेल्या अर्धा एकर जागेवर अत्याधुनिक पद्धतीने बुद्ध विहार उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तो सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.

शिवर येथे पार पडलेल्या दहा दिवसीय धम्ममेळाव्यात अवघ्या एका तासात ४० लाख रुपये जमा करण्याचा ऐतिहासिक पराक्रम शरद चौरपगार यांनी केला. या घटनेने उपस्थितांना आश्चर्यचकित करत धम्मसेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. दरम्यान, विदर्भातील तब्बल २०० बुद्ध विहारांमध्ये ई-लायब्ररी, व्यायामशाळा तसेच भिक्खू निवास उभारण्याचा महासंकल्प त्यांनी जाहीर केला असून, या उपक्रमामुळे युवकांना शिक्षण, आरोग्य व साधना यांचा संगम लाभणार आहे.

गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, नागपूर, अमरावती, अकोला व बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये त्यांनी बुद्ध विहारांना धम्मदान देत ई-लायब्ररी उभारणीचे मोठे कार्य केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या 'आपल्या मिळकतीतील विसावा हिस्सा समाजासाठी दान करा' या विचाराने प्रेरित होऊन शरद चौरपगार हे कार्य करत असून, त्यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण विदर्भात स्वागत होत आहे.

त्यांच्या या कार्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत असून, ते अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

# देगलूरात सोशल मीडियावर एआय रील्सचा ट्रेंड

## सोशल मीडियावर विविध विषयांवरील एआय रील्सचा बोलबाला

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे




**देगलूर :** जम्मू-काश्मीरमधील निसर्गसौंदर्य दाखविणारे, केरळमधील समुद्रकिनाऱ्यावरील रील्स असो वा एखाद्या खाद्यपदार्थाचे वैशिष्ट्य सांगणारे अन अगदीच कलेवर आधारित एआय रील्स असो... असे रील्स इन्स्टाग्राम, फेसबुक पाहताना नजरेस पडत असतील... सध्या अशाच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेल्या रील्सची धूम असून, तरुणाईकडून आता एआयद्वारे तयार केलेले रील्सही इन्स्टाग्राम, फेसबुकवर अपलोड केले जात आहेत. पर्यटन, फूड, कलासंस्कृती, विनोदी, राजकारण आदी विषयांवर आधारित एआय रील्सचा बोलबाला आहे. त्यामुळेच एआयचे विविध ॲप वापरून रील्स तयारकेले जात असून, त्यात पर्यटनावरील रील्सची संख्या मोठी आहे. एआय रील्स सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय, हे आता केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित राहिलेले नाही; तर ते थेट सोशल मीडियावरील कंटेंट निर्मितीतही मोठी भूमिका बजावताना दिसत आहे. विशेषतः रील्स तयार करण्यासाठी एआयचा वापर वाढताना दिसत आहे. सध्या एआय रील्स हा नवा ट्रेंड मोठ्या वेगाने लोकप्रिय होत आहे. आज अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी, इन्फ्लुएन्सर्स तसेच छोटे व्यावसायिक ए आयच्या मदतीने रील्स तयार करीत आहेत. यामुळे वेळ, मेहनत आणि खर्च वाचत असून, त्यांच्या या रील्सच्या प्रयोगाला प्रतिसादही मिळत आहे. उदा. काश्मीरमधील पर्यटनावर आधारित रील्समधून आपण जणू काश्मीरमध्येच आहोत, याची अनुभूती मिळते, विशेषतः तरुणाईमध्ये एआय रील्सची मोठी क्रेझ पाहायला मिळत आहे. करिअर मार्गदर्शन, जीवनाबद्दल प्रेरणा देणारे, मार्ग दाखविणारे रील्स, फॅशन, ट्रॅव्हल, फूड अशा विविध विषयांवर एआय रील्स तयार केल्या जात आहेत. इन्स्टाग्राम, फेसबुक, यू-ट्यूब या सोशल मीडिया व्यासपीठावर असे रील्स मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत. याविषयी प्रणव तावरे म्हणाला, मी एआयच्या साहाय्याने लहान व्हिडीओ तयार करून ते इन्स्टाग्रामवर अपलोड करतो, खास करून पर्यटनावर आधारित असे रील्स मी तयार करीत आहे आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. माझ्यासारखे अनेक तरुण रील्ससाठी एआय वापर करीत आहेत आणि हा ट्रेंड सध्या वाढत आहे.

### एआय रील्समुळे हे घडतेय...

एआय रील्स म्हणजे एआयवर आधारित ॲपच्या मदतीने आपोआप तयार होणारे छोटे व्हिडिओ. मोठे ब्रँड्स, छोटे व्यावसायिक एआय रील्सच्या मदतीने जाहिराती, सवलती आणि प्रॉडक्टच्या प्रसिद्धीचे व्हिडिओ तयार करीत आहेत. कमी खर्चात प्रभावी जाहिरात मिळत असल्याने डिजिटल मार्केटिंग अधिक मजबूत होत आहे. एआय वापरणे आता सोपे झाल्याने ग्रामीण भागातील तरुणही अशा रील्स निर्मितीकडे वळत आहेत....

**बालाजी झरे**
**प्रेरणा कॉम्प्युटर रामपूर रोड देगलूर**

# नवदीपसिघ व हाजूसिघ कामठेकर यांच्याकडून चांदगड यात्रा चंद्रपूर देवदर्शन मोफत



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी
शेख शादुल्ला शेख युनुस

**अर्धापूर :** स्व. स. रणजितसिघ कामठेकर उपसरपंच यांच्या स्मरणार्थ नवदीपसिघ कामठेकर व हाजुसिघ कामठेकर यांच्या वतीने दरवर्षी चांदगड यात्रा कामठेकर गावकऱ्यांना चंद्रपूर येथे दरवर्षी काढत असतात. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा कामठा गावातून नवदीपसिघ कामठेकर यांनी चांदगढ मोफत यात्रा काढण्यात आली. ही यात्रा सर्व गावकऱ्यांना मोफत असून जेवणाची सोय पण मोफत आहे. या यात्रेला गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या यात्रेला चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला आहे.

# केळशी महालक्ष्मी देवीचा रथ उत्सव उत्साहात सुरू




दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंडणगड - प्रतिनिधी
उमेश तबिब

**मंडणगड :** रत्नागिरी जिल्ह्यातील केळशी येथे महालक्ष्मी देवीची यात्रा आणि पारंपरिक रथोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा होत आहे. साडेतीनशे वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवात देवीचा रथ खांद्यावरून ओढण्यासाठी अनोखी परंपरा जपली जाते, तरुण मंडळी उत्साहाने सहभागी होत आहेत. महालक्ष्मी मंदिरातून निघालेला रथ केळशी गावातील सर्व वस्त्यांमधून प्रदक्षिणा घालत पुन्हा मंदिरात परत येतो. ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात हा सोहळा पार पडतो. विशेष म्हणजे सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येऊन या उत्सवात सहभागी होत सामाजिक एकतेचा संदेश देतात. महालक्ष्मी मंदिरात आज दिवसभर भजन कीर्तन प्रवचन धार्मिक कार्यक्रम साजरे होतात तसेच देवीच्या मंदिरासमोर भव्य यात्रा भरते, सांस्कृतिक कार्यक्रमाने या यात्रेचे सांगत होते. केळशी गावातील महालक्ष्मी चा रथ ओढण्यासाठी तरुण मंडळी सह अबाल वृद्ध मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित.

# आजचे राशि भविष्य




**मेष :** तंदुरुस्ती आणि वजन घटविण्याचे उपक्रम आपल्या शरीरास चांगला आकार देण्यासाठी उपयोगी ठरतील. जीवनसाथीच्या आरोग्य संबंधित समस्यांमुळे तुमचे धन खर्च होऊ शकते परंतु, तुम्हाला या विषयी चिंता करण्याची आवश्यकता नाही.

**वृषभ :** धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. ज्या लोकांनी कुणी अनोळखी व्यक्तीच्या सल्ल्यावर काही धन गुंतवणूक केली होती आज त्यांना त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**मिथुन :** अमर्याद ऊर्जा आणि उत्साह तुमच्यात सतत सळसळत राहील. त्यामुळेच मिळालेल्या प्रत्येक संधीचा तुम्ही योग्य फायदा घेऊ शकाल. जीवनाच्या गाडीला चांगल्या प्रकारे चालवण्याची इच्छा आहे तर, आज तुम्हाला पैश्याच्या बाबतीत विशेष काळजी घ्यावी लागेल.

**कर्क :** खाण्यापिण्याबाबत दक्षता बाळगा. निष्काळजीपणा तुम्हाला आजारी पाडू शकतो. आज जवळच्या मित्राच्या मदतीने काही लोकांना आज चांगले धन लाभ होण्याची शक्यता आहे. हे धन तुमच्या बऱ्याच समस्यांना दूर करू शकते.

**सिंह :** उच्च व्यक्तिमत्वाच्या व्यक्तीला भेटताना उदास होऊन आपला आत्मविश्वास हरवू देऊ नका. ते जसे आरोग्यासाठी फायदेशीर आहे, तितकेच आपल्या व्यवसायाचे भांडवलदेखील आहे.

**कन्या :** कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. आपल्या आजी आजोबांशी बोलताना त्यांच्या भावनांना धक्का लागणार याची काळजी घ्या, बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** तुमच्या तणावमुक्तीसाठी तुम्ही कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा घ्या. त्यांची मदत घेणे उपकारक ठरेल. तुमच्या भावना आणि तणाव आतल्या आत दाबून ठेवू नका. आपल्या समस्या दुसऱ्यांना सांगण्याने त्या सोडविण्यासाठी त्यांची मदत घेणे संयुक्तिक ठरते.

**वृश्चिक :** धर्मपरायण व्यक्तीचे शुभाशिर्वाद तुम्हाल मन:शांती मिळवून देतील. तुमच्या भाऊ-बहिणींपैकी आज कुणी तुमच्याकडून उधार मागू शकतात. तुम्ही त्यांना पैसे उधार घ्यालच परंतु, यामुळे तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

**धनु :** आरोग्याच्या दृष्टीने हा काळ एकदम रटाळ आहे, त्यामुळे आपण काय खाता-पिता त्याबाबत काळजी घ्या. लोकांना नेमके काय हवेय हे समजावून घ्या आणि तुमच्याकडून काय हवे आहे तेही समजून घ्या - परंतु आज खर्च करताना उधळपट्टी करू नका.

**मकर :** तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. आज धन लाभ होण्याची शक्यता आहे परंतु, असे होऊ शकते की, आपल्या रागीट स्वभावाच्या कारणाने तुम्ही पैसा कमावण्यात सक्षम होणार नाही.

**कुंभ :** कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. तुम्हाला गरज भासलीच तर मित्र मदतीला धावून येतील.

**मीन :** आज तुम्हाला महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील - त्यामुळे तुम्ही तणावपूर्ण व्हाल आणि कमालीचे उदास व्हाल. अनेक माध्यमातून आर्थिक लाभ होतील.

# हनुमान जयंती निमित्त माजी आ.रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते हनुमान चालीसाचे वाटप

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी




**नांदेड :** जुना लोहा शहरातील मारोती मंदिर येथे हनुमान जन्मोत्सव निमित्त शिवसेना (उबाठा) चे जेष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण व सुर्यकांत गुरू सनपुरकर यांच्या हस्ते पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या वतीने उपस्थित हनुमान भक्तांना हनुमान चालीसा चे वाटप करण्यात आले. प्रथमतः खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार यांच्या हस्ते व माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हनुमंत रायाचा अभिषेक करण्यात आला. तत्पुर्वी हनुमान गाथेचे वाचन सकाळी ५.३० ते ६.४५ या वेळेत सूर्यकांत गुरु सनपुरकर यांनी केले. श्रीच्या आरती नंतर गुलाल उधळण्यात आला. यावेळी श्रवण व महाप्रसाद घेण्यासाठी गावातील उपस्थित सर्व भाविक भक्तांना यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे नांदेड (दक्षिणचे) जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या वतीने आयोजित हनुमान चालीसा चे वाटप शिवसेना उबाठा चे जेष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण व सुर्यकांत गुरू सनपुरकर यांच्या हस्ते करण्यात आले. हनुमान जन्मोत्सव निमित्त हनुमान चालीसा वाटप कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, नगरसेवक, गोपाळ सावकार कवठेकर, हरिभाऊ चव्हाण, नामदेव पा. पवार, बालाजी अंकुलवार, शिक्षक नेते विठू भाऊ चव्हाण, बी.वाय. चव्हाण, काशिनाथ शिरशीकर सर, श्यामअण्णा पवार, किसन काळेसर, आप्पाराव पवार, लक्ष्मण कांजले, पत्रकार संजय कहाळेकर, हनुमंत पांचाळ, गजानन दांगटे, बबरूपा. पवार, गंगाधर पवार, मोहन मुंडे, गोविंद पवार, सूर्यकांत चव्हाण, दीपक चव्हाण, ऋतिक पवार, आदी हनुमान भक्त उपस्थित होते.

Om Dental Care & Implant Centre
Shree nagar, Nanded.
डॉ. विवेक टापरे
बी.डी.एस.
मो. 9096968440
ओम
डेंटल इंम्प्लांट | रुट कॅनल | ऑर्थोडोंटीक
ॲडव्हान्स डेंटल हॉस्पीटल



पत्ता : राज मोहम्मद कॉम्प्लेक्स, पहनावा ड्रेसेस जवळ, मेन रोड, श्रीनगर, नांदेड.